# जगदीश खांदेवाले



# कन्फेशन

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# कन्फेशन

लेखक

जगदिश खांदेवाले

# कन्फेशन

## लेखक. . . जगदिश खांदेवाले

फ्लॅट नं ११३ शिवशंकर सोसायटी.
शिवतीर्थ नगर कोथरुड पुणे ४११०३८
मो. नं ९१५८६६१६३८
Email id – jlkhandewale@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान


**www.esahity.com**

esahity@gmail.com

Whatsapp: 9987737237

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604

**प्रकाशन : १८ मे २०२४**



©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे



ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे प्रकाशित होणारी ही माझी आठवी कादंबरी सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

नोकरी, व्यवसायात चाकोरीबाहेर काम करणाऱ्यांची दखल प्रसारमाध्यमे, समाज नेहमीच घेतो. अश्याच एका पोलीस अधिकाऱ्याची ही कथा आहे.

आशा करतो ही आपल्याला आवडेल.

ई साहित्य प्रतिष्ठानचे श्री. सुनीळ सामंत यांनी वेळोवेळी प्रोत्साहन देऊन मला लिहिते केले, लिहिते ठेवले याबद्दल मी त्यांचा शतशः आभारी आहे

ई साहित्य प्रतिष्ठानच्या टीमचे विशेष आभार.

. जगदिश खांदेवाले



# अर्पणपत्रिका

चि. ओजस (वय वर्षे चौदा),
चि. विराज (वय वर्षे सात)
आणि चि. आदिराज (वय वर्षे २)
यांच्या सहकार्याशिवाय
मी एक शब्दही लिहू शकलो नसतो….

# कन्फेशन

या कादंबरीतील सर्व घटना, स्थळे व व्यक्ती काल्पनिक असून त्यांचा कोणाही व्यक्ती स्थळ वा घटनेशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग मानावा.

# प्रकरण १

“फादर, मी तीन खून करणार आहे. "

कन्फेशन बॉक्समधे शब्द घुमले आणि ते ऐकणारे फादर शहारले.

“माय चाईल्ड. शिक्षा करण्याचा अधिकार फक्त ईश्वराला आहे.” फादर शांत आणि संयत स्वरात म्हणाले.

“पैशाच्या जोरावर हे तिघेही कायद्याच्या कचाट्यात न सापडता आज उजळ माथ्याने फिरत आहेत.”तोच गंभीर आवाज ठामपणे म्हणाला, “त्यांना शिक्षा झालीच पाहिजे.”

“माय सन. असा अविचाराने वागू नकोस. ईश्वराच्या कामात हस्तक्षेप करू नकोस.”

“ईश्वराची हीच इच्छा आहे की हे काम मी करावे.” परत ठामपणे गंभीर आवाज आला.

काही बोलण्याचा फादरनी प्रयत्न केला. तोच कोणीतरी बॉक्समधून उठल्याचा आणि बाहेर गेल्याचा आवाज आला. फादर लगबगीने बाहेर आले आणि पोर्चपर्यंत गेले पण त्यांना कोणीही दिसले नाही. तसेच पुढे जात ते प्रवेशद्वारापर्यंत गेले पण कोणीही आढळले नाही. दाराजवळच दोनतीन

मेणबत्त्या आणि फुलांची दुकाने होती . फादर अचानक बाहेर आलेले बघून त्यांना आश्चर्य वाटले .

“काय झाले फादर?” त्यातील एकाने विचारले.

“काही नाही. तुम्ही आत्ता इथून कोणाला जातांना बघितले काय?”

“नाही फादर.”

फादर आता द्विधा मनःस्थितीत पडले. आपल्याला भास झाला की काय असेही त्यांना क्षणभर वाटले. पण लगेच त्यांनी स्वतःला सावरले. हे रेग्युलर कन्फेशन नव्हते त्यामुळे एक जबाबदार नागरिक म्हणून पोलिसांना सांगणे त्यांचे कर्तव्य आहे असा निर्णय त्यांनी घेतला आणि येणाऱ्या रिक्षाला हात केला.

“पोलीस आयुक्त कार्यालय.”रिक्षात बसत ते म्हणाले.

-----------*---------

# प्रकरण २

वीस मिनिटात रिक्षा आयुक्त ऑफिसला पोचली. फादर थेट आयुक्तांच्या पीए समोर उभे राहिले.

“मी फादर दिब्रिटो. मला आयुक्तांना भेटायचे आहे.”

“फादर,मी तुम्हाला ओळखते.”नीला, आयुक्तांची पीए लगबगीने उभी राहून म्हणाली. “आपल्या कामाचे स्वरूप कळू शकेल?”

फादर घुटमळत म्हणाले, “सॉरी बेटा. मी ते त्यांनाच सांगेन.”

“काही हरकत नाही. तुम्ही जरा दहा मिनिटे थांबा.” बाजूच्या खुर्चीकडे निर्देश करत नीला म्हणाली. “सरांची एक मीटिंग सुरु आहे. दहा मिनिटात संपेल. नंतर मी विचारते.”

“चालेल.” म्हणत फादर खुर्चीत बसले. बरोबर दहा मिनिटानी आतमधून खुर्च्या मागे सरकवल्याचा आवाज आला आणि पाच अधिकारी एकमेकांशी बोलत बाहेर आले. नीला आणि फादरकडे ओझरती नजर टाकत अस्फुटसे गुड नून म्हणत सर्व गेले. फक्त एकजण थोडा रेंगाळला. त्याची आणि नीलाची जरा जास्त घसट असावी कारण नीलाने हसून त्याला विचारले, “काय जॉनी,आता दोन आठवडे मजा कर. हॅपी जर्नी.”

जॉनी थबकला. संशयाने नीलाकडे बघत म्हणाला, “तुला कोणी सांगितले? रोमाने?”

“होय. माझी क्लासमेट आहे ती.”

“असेल पण या वेळेला जर माझी रजा कॅन्सल झाली तर बघ मी काय करतो.” तो अजून पुढे काही बोलणार तेवढ्यात फादरकडे लक्ष गेल्याने गप्प बसला.

“मी कशाला काय करू.”असे नाटकीपणे म्हणत नीला केबिनमधे गेली आणि दुसऱ्याच मिनिटाला तिने दार उघडून त्यांना आत येण्याची खूण केली.

“या फादर .”आयुक्त उमेश पांडे उभे राहत म्हणाले . उमेश पांडे म्हणजे एक रुबाबदार व्यक्तिमत्व होते. गोरा वर्ण, उणीपुरी सव्वासहा फुट उंची, खर्जातला आवाज, पिळदार शरीरयष्टी. सर्वावर ताण म्हणजे ताबडतोब निर्णय घेण्याची क्षमता. आपले सहकारी आणि त्याची क्षमता याबाबत त्यांचे निर्णय अचूक असत. एकंदरीतच गोव्यातील शांतता आणि सुव्यवस्थेला तेच जबाबदार असतात असे गमतीने म्हणल्या जात असे.

“थॅन्क्स.”असे पुटपुटत फादर खुर्चीत विसावले. ते बसताक्षणीच नीला केबिनबाहेर गेली.

“रिलॅक्स .” पाण्याचा पेला समोर सरकवीत आयुक्त म्हणाले.

त्यासरशी त्यांनी पेला उचलला आणि पाणी पूर्ण संपवूनच खाली ठेवला. ते पाणी पीत असतांना आयुक्त बारकाईने बघत होते. एकंदरीत हालचालीवरून तरी फादर बरेच अस्वस्थ वाटत होते. तशी दोघांचीही औपचारिक ओळख होती पण इतक्या तणावाखाली फादर याआधी कधीच दिसले नव्हते. फादर पण पाणी

पिताना विचार करत होते की इथे येण्यात आपण काही घाई तर केली नाही? सर्व ऐकल्यावर काय हा मूर्खपणा म्हणत आपली बोळवण तर केली जाणार नाही? फादर पुरेसे स्थिरावले असे बघून आयुक्त म्हणाले,

“आता शांतपणे सांगा. काय झाले?

फादर संकोचून म्हणाले, “बाब तर तशी फार किरकोळ आहे. सांगावी की नाही हे पण मला कळत नाही.” आश्वासक सुरात आयुक्त म्हणाले, “कितीही किरकोळ असू द्या तुम्ही निसंकोचपणे सांगा.”

त्यासरशी फादरनी झालेली घटना सांगितली. त्यांचे बोलणे पूर्ण झाल्यावर जणू बोलावल्यासारखी नीला चहा घेऊन आली आणि दोघांसमोर चहाचे कप ठेवून गेली. ती जाताच फादर परत म्हणाले, “जे झाले ते इतके त्रोटक आणि वेगात झाले की तुम्हाला सांगण्यासाठीपण माझ्याकडे जास्त काही नाही. इतक्या तुटपुंज्या माहितीवर तुम्हीतरी काय तपास करणार?”

त्याबरोबर आयुक्त घाईघाईने म्हणाले, “असे अजिबात समजू नका फादर उलट अशा किरकोळ घटनेतच मोठ्या घटनेची बीजे असतात. तुम्ही ही घटना रिपोर्ट करण्याचा निर्णय घेतला हे फार चांगले केले.”

आता फादर जरा शांत झाले. त्यांना हायसे वाटले. चला निदान आपले म्हणणे तरी यांनी ऐकून घेतले म्हणून थॅन्क्स म्हणत ते उठू लागले तोचआयुक्त त्यांना हातानी थांबण्याची खूण करत म्हणाले, “तुमचे एक स्टेटमेंट आमच्या अधिकाऱ्याकडे द्या. ते तपास करतील. तुम्ही इथेच थांबा.” बाजूच्या सोफ्याकडे निर्देश करत ते म्हणाले. “मी त्यांना इथेच बोलवतो.”

ठीक आहे म्हणत फादर सोफ्यावर विसावले.

आता ही केस हडेलहप्पी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे सोपविण्यात अर्थ नव्हता. चाकोरीबाहेर जाऊन विचार करणारा अधिकारीच याकरता योग्य ठरला असता. पहिले नाव त्यांच्या डोळयासमोर आले ते जॉनी मेंडोझाचे.

एसीपी जॉनी मेन्डोझा हा अतिशय हुशार आणि तडफदार अधिकारी होता. केवळ कल्पनाशक्ति आणि तर्कावर विचार आणि कृती करायची असेल तर त्याची कामगिरी अतिशय बहरत असे. बऱ्याच केसेस, ज्या बंद पडण्याच्या मार्गावर होत्या त्या त्याने पाठपुरावा करून सोडविल्या होत्या. पण, हो एक पण त्याच्या बाबतीतही होता. तो म्हणजे त्याने तडीला लावलेल्या केसेस न्यायदानावेळी विलंबात अडल्या तर ते त्याला अजिबात सहन होत नसे. न्यायदानातील विलंब म्हणजे न्याय नाकारणे हे त्याला शत प्रतिशत मान्य होते. त्यामुळेच की काय सुरवातीच्या काही कटू प्रसंगानंतर त्याच्या केसेस मधील आरोपी कधी मारल्या जात तर कधी गूढरित्या नाहीसे होत. त्यामुळे खातेनिहाय चौकशीचा ससेमिरा त्याच्यामागे सतत असे पण अजूनपर्यंत तरी तो नेहमी निर्दोष म्हणूनच शाबीत झाला होता. दोन महिन्यापूर्वीच्या एका गँगरेपच्या केसमधे त्याने चोवीस तासाच्या आत चारही आरोपी पकडले होते. एवढेच नव्हते दोनतीन हजाराचा जमाव त्याच्या ठाण्यावर ‘हे आरोपी आमच्या हवाली करा कारण आम्हाला माहिती आहे की ते कोर्टात निर्दोष सुटतील’अशी मागणी करत चालून आला असता निडरपणे समोर जात ‘या वेळेस असे होणार नाही, त्वरित न्याय मिळेल. ही जबाबदारी माझी’ असे सांगून जमावाला शांत केले

होते. योगायोगाने जॉनीच्या म्हणण्याप्रमाणे पाच दिवसांनी पहाटे चारच्या सुमारास आरोपींनी गुन्ह्याच्या जागी गुन्हा कसा घडला हे दाखवत असताना पळण्याचा प्रयत्न केला आणि पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चौघेही ठार झाले. ठपका अर्थातच जॉनीवर आला. मानवाधिकार कार्यकर्ते जागृत झाले. अवेळी ही ट्रायल घ्यायची गरज काय होती? मानवाधिकाराचा भंग असे अनेक मुद्दे काढून गोव्यातील वातावरण त्यानी ढवळून काढले होते. आयुक्त पण त्रस्त झाले होते तरीपण मनात जॉनीला शाबासकी देत होते. न्यायालयात जॉनी आणि त्यांच्या टीमवर लोकांनी अक्षरश: फुले उधळली होती. याच कारणामुळे सध्या तो हेडऑफिसमधे डेस्क जॉबवर होता. हे तुलनेनी साधे प्रकरण जॉनी चांगले हाताळेल याची त्यांना खात्री होती. जॉनीच्या मदतीला कोण द्यावे यावर त्याना जास्त विचार करायची गरज पडली नाही. अजय देशमुख हा पोलीस निरीक्षक जॉनीच्या तुलनेनी बराच शांत, शक्यतो कायदयाच्या चौकटीत राहून काहीतरी वेगळ्याच कल्पना राबवणारा होता. अजयचे नाव आठवताच त्यांना नकळत हसू फुटले. त्याला कारण एक प्रसंग होता. एकदा विमाननगर परिसरात छेडखानी आणि पाकीटमारीचे प्रकार फार वाढल होते. अजयकडे त्यांनी ही जबाबदारी जबाबदारी सोपवली आणि दुसऱ्याच महिन्यात ते प्रकार पन्नास टक्के कमी झाले. हे त्यांना जाणवले कारण आमच्या मुलाला सोडून द्या, तो परत असे करणार नाही असे बडे बापांचे फोन जवळपास बंद झाले. काय झाले असावे याचा त्यांनी त्यांच्या पद्धतीने शोध घेतला. त्याना कळले ते असे की अजय आणि त्याची टीम, रोड साईड रोमिओ पकडण्याच्या, केस करायच्या

भानगडीत पडतच नव्हते. ते सरळ पकडलेल्या मुलांचे चकोट करीत. परिणामी प्रकार बंद झाले. दुसरे पाकिटमारीच्या बाबतही तेच. पकडले तर चकोट शिवाय ड्रेस कोड असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना रजेवर किंवा घरी असले तरी बाहेर जातांना ड्रेस वापरायला सांगितले होते. कोणीतरी पोलीस, ड्युटीवर असो वा नसो जवळपास आहे हे आहे असे दिसल्यावर पाकीटमारी आपोआप कमी झाली.

याहूनही दुसरी घटना जास्त मजेदार होती. झाले असे की डिचोली परिसरात भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण अचानक वाढले. त्यातच भर पडली ती 'डिचोली समाचार' या ग्रामदैनिकाच्या अवास्तव रिपोर्टिंगची. त्यांच्या देशमाने या पत्रकाराने इतका गाजावाजा केला की जणू भरदिवसा लुटमार सुरु आहे. मिरवायची हौस असल्याने तो चारजणांना बरोबर घेऊन कमिशनरांना भेटायला आला. हेतू हाच होता की माझी कशी पोलीसात ओळख आहे, मी त्यांना कसा जाब विचारतो हे दाखवणे. योगायोगाने अजय ऑफिसला आला होता. तो आणि आयुक्त ऑफिसमधे बोलत असता हे शिष्टमंडळ आले. औपचारिकता म्हणून आयुक्त शिष्टमंडळाला सामोरे गेले. सोबत अजय होता. त्यांना बघताच देशमानेनी सरबत्ती सुरु केली . हे काय चालले आहे. पोलीस काही लक्ष देत नाही. डिचोली असुरक्षित झाले आहे वगैरे वगैरे. आयुक्त शांतपणे ऐकत होते. सुरवातीचा जोर ओसरल्यावर त्यांनी देशमानेला शांतपणे विचारले,"तुम्ही तक्रारी नोंदविल्या आहेत काय?"

त्यासरशी देशमाने जरा गडबडला पण तसाच रेटून म्हणाला, “जे उघड उघड दिसते ते पोलिसांना दिसत नाही काय?”

“बरोबर आहे. पण कशाच्या आधारे तपास केला, काय तपास करायचा यासाठी तक्रार तर पाहिजे. तुम्हाला काय वाटते पोलीस काहीच करत नाही?”

“करत असतील पण परिणाम दिसत नाही. तुम्ही स्वतः यात लक्ष घाला.”

“ठीक आहे, अजय यांच्याबरोबर चर्चा कर आणि दोघे मिळून ठरवा.”

अजय लगेच पुढे आला आणि देशमानेंना म्हणाला, “पोलीस रात्रीची गस्त वाढवतील.”

“नेहमी म्हणतात पण काही वाढवत नाही.”देशमाने बोलून गेला आणि तिथेच चुकला.

“पोलीस रजिस्टर मेन्टेन करतील आणि तुमची त्यावर स्वाक्षरी घेतील.” असे म्हणून अजयने विषय संपवला.

आपली काय वट आहे हे बाकीच्यांना लक्षात आले असेल या जाणिवेने देशमाने अजून फुगला.

“दुसऱ्या कोणाच्याही सह्या घेऊ नका.” त्याने बजावले.

“तुमचीच सही घेऊ आणि आठ दिवसांनी आपण परत भेटून आढावा घेऊ.”

“चालेल.” समोर आलेला चहा घेत सर्वांनी माना डोलावल्या.

बाहेर पडल्यावर देशमाने सर्वांना म्हणाला,“बघा झाले की नाही सरळ? असे खडसावे लागते.”

सर्वांनी वाहवा केली आणि घरची वाट धरली.

देशमानेंना पण छान वाटले. त्याच दिवशी रात्री दहा वाजता त्यांच्या घराची बेल वाजली. त्यांनी दार उघडले तर दारात एक पोलीस रजिस्टर घेऊन उभा होता. सलाम करून तो म्हणाला, “आताच गस्तीचा एक राऊंड पूर्ण झाला. सही करा.” देशमानेनी झोकात सही केली आणि तो गेला.

परत बारा वाजता बेल वाजली. दुसरा पोलीस दारात उभा होता. संभाषण तेच. सकाळी सहापर्यंत हाच प्रकार सुरु होता. दर दोन तासांनी पोलीस हजर होत, सही घेत आणि जात. देशमानेनी दर दोन तासांनी यायची गरज नाही सांगण्याचा प्रयत्न केला. पण ते ऐकायला तयार नव्हते. ‘ वरून ऑर्डर आहे. तुमच्याच सह्या घ्यायच्या म्हणून. आमच्या नोकरीचा प्रश्न आहे. ’ ते नम्रपणे सांगत . दोन रात्री तर देशमानेनी कशाबश्या काढल्या. पण तिसऱ्या रात्रीपासून त्याना काय करावे ते सुचेना. झोप न झाल्याने त्यांच्या कामावर परिणाम होऊ लागला. दिवसाजरी बेल वाजली तरी ते दचकू लागले. सगळीकडे त्यांना पोलीस दिसू लागले आणि ते आपल्याला सह्या मागत आहेत असे भास होऊ लागले. शेवटी चार दिवसांनी ते अजयला भेटले आणि पोलीस व्यवस्थित काम करत आहेत याची मला खात्री पटली आहे. माझी तक्रार नाही. आता रजिस्टर मेन्टेन करायची गरज नाही असे त्यांनी रजिस्टरवरच लिहून दिले .

-----------*---------

# प्रकरण ३

आयुक्त या विचारात असतांना चहाचे कप न्यायला पोऱ्या आला. त्यालाच नीला मॅडमला पाठव असे त्यांनी सांगितले. नीला येताच अजय देशमुख आणि जॉनी मेंडोझाला ताबडतोब बोलव असे सांगितले. नीलाने त्यांच्या समोरच फोन लावले. अजयने लगेच येतो म्हणून सांगितले पण जॉनीचा फोन स्विच ऑफ होता. तिने तेही त्यांना सांगितले. 'अरे हो. तो रजेवर जाणार आहे नाही का?' जे स्वतःशीच पुटपुटले. नीलाला काय बोलावे सुचेना.

"तो घरी पोचला असेल काय?" त्यानी विचारले.

"दहा मिनिटांनी पोचेल."

यावर आयुक्त स्वतःशीच हसले आणि त्यांनी सरळ रोमाला, जॉनीच्या पत्नीला फोन लावला आणि म्हणाले, "रोमा, मी उमेश अंकल बोलतोय."

"बोला अंकल. काय म्हणता?" रोमा म्हणाली.

"बेटा, जॉनीचा फोन स्विच ऑफ आहे. बहुधा ड्रायव्हिंग करत असेल म्हणून तुला फोन केला."

"काही हरकत नाही अंकल. काही निरोप आहे काय?"

"होय. तो आल्याबरोबर मला ताबडतोब भेटायला सांग." आयुक्त म्हणाले. तेवढ्यात फाटक उघडण्याचा सूक्ष्म आवाज त्यांना ऐकू आला.

"एक मिनिट बहुधा, तो आलाच असावा. तुम्हीच बोला." रोमा म्हणाली.

"नको मी घाईत आहे. त्याला ताबडतोब पाठव आणि त्याची रजा कॅन्सल झाली आहे हे पण सांग." असे म्हणत त्यांनी फोन कट केला. हे सर्व नीलाने ऐकले आहे हे त्यांच्या लक्षात आले होते पण त्यांनी तसे काही दर्शविले नाही. नीलापण या सर्व गोष्टींना अपरिचित नव्हती. गेली आठ वर्षे ते बरोबर काम करत होते. दोघांचेही चांगले ट्यूनिंग होते. हे असले छोटे मोठे प्रसंग नेहमीचे होते. एकंदरीतच आयुक्त कडक शिस्तीचे म्हणून प्रसिद्ध असले तरी आपल्या सहकाऱ्यांना कायम सांभाळून घेत असल्याने चांगलेच लोकप्रिय होते. त्यांचा दरारायुक्त आदर होता. एवढ्यात अजय आला. त्याला त्यांनी फादरचे स्टेटमेंट घ्यायला सांगितले आणि दुसऱ्या कामाकडे वळते. पंधरा मिनिटानी जॉनी आला आणि खाडकन सॅल्युट मारुन उभा राहिला. . त्याला त्यांनी बसण्याची खूण केली. तेव्हा ते स्टेटमेंट वाचत होते. जॉनी बसताच त्यांनी ते स्टेटमेंट जॉनीला दिले. स्टेटमेंट वाचून होताच जॉनीने विचारले, "एवढेच?"

"होय. एवढेच." आयुक्त शांतपणे म्हणाले.

"काही तपशील सुटले तर नाहीत?" जॉनीने अजयला विचारले.

"नाही सर. मी परत परत विचारले पण एवढीच माहिती आहे." अजय म्हणाला.

"जॉनी, तू आणि अजय यावर ताबडतोब काम सुरू करा. हे प्रकरण जेवढे वाटते तेवढे क्षुल्लक नाही. कोणत्याही परिस्थितीत हे खून होणार नाहीत याची आपण दक्षता घेतली पाहिजे आणि संभाव्य खुन्याला पकडले पाहिजे."

“टोटली ॲग्री सर. फक्त आपल्याकडे कसलेच धागेदोरे नाहीत. एवढी तुटपुंजी माहिती सोडल्यास.” हातातील स्टेटमेंट फडकवत जॉनी म्हणाला.

“हे खरे आहे. ज्यांचे खून होतील त्यांची नावे,पत्तेआणि मोबाइल नंबर असते तर बरे झाले असते हे मला मान्य आहे.” आयुक्त उपरोधाने म्हणाले, “पण मग तुझी माझी गरज पडली नसती.”

आपण जरा जास्तच बोललो हे जाणवल्याने जॉनी पटकन उठला आणि परत सॅल्युट मारून अजयला चला म्हणाला पण आयुक्त थांबायला तयार नव्हते. ते म्हणाले, “जॉनी मला रिझल्ट पाहिजे कारणे नकोत अँड किप मी पोस्टेड.”

“यस सर.”जॉनी म्हणाला आणि तिघेही बाहेर जाऊ लागले. जॉनी मुद्दाम थोडा रेंगाळला. फादर आणि अजय दरवाज्याबाहेर जाताच जॉनी गरकन मागे वळून आयुक्तांना म्हणाला, “बाकी सर माझी रजा कॅन्सल झाली हे रोमाकडून मला सांगण्याची तुमची युक्ती मला आवडली.” आणि ते काही बोलण्याच्या आत बाहेर गेला देखील.

बाहेर फादर आणि अजय त्याच्याकरता थांबले होते. आपल्यामुळे आयुक्त आणि जॉनीची खडाजंगी झाली,त्याची रजा कॅन्सल झाली या विचाराने फादर जरा ओशाळले होते. जॉनी बाहेर येताच ते त्याला म्हणाले, “ऑफिसर,”

“जॉनी.”

“ओके. जॉनी. सॉरी.”

“सॉरी कशाबद्दल?”

“माझ्यामुळे तुझी रजा कॅन्सल झाली आणि आयुक्त तुला बोलले त्याबद्दल.”

जॉनी फादरकडे आश्चर्याने बघतच राहिला. इतक्या किरकोळ गोष्टीचा विचार करणारा माणूस तो प्रथमच बघत होता. पटकन स्वतःला सावरत तो म्हणाला, “हे नेहमीचे आहे. उलट आज ते चांगल्या मूडमधे होते.”

“हा चांगला मूड होता?”

“हो. नेहमी ते मला गेट ऑउट म्हणतात.” जॉनी शांतपणे म्हणाला.

मग काय बोलणेच खुंटले फादर मनात म्हणाले आणि तिघेही पार्किंग लॉटकडे चालू लागले.

“मी इथून जाईन.”फादर म्हणाले.

“कुठे?” जॉनीने विचारले.

“चर्चला.”

“आपण तिघेही चर्चला जाणार आहोत.”

“मी तर स्टेटमेंटमधे सर्व दिले आहे. अजून काय बघणार?” फादर म्हणाले पण त्यांना मनातून उत्सुकता होतीच की हा अजून काय करणार? तशीच भावना अजयचीपण होती.

“गेल्यावर बघू.” अजयला चलण्याची खूण करत जॉनी बेफिकिरीने म्हणाला.

फादरचे अजयबद्दलचे मत आतापर्यंत तरी चांगले होते पण अजयचे ड्रायव्हिंग बघून त्यांचे मत बदलले. अजयचे ड्रायव्हिंग केवळ खराब नव्हते तर अतिशय खराब होते. रस्त्यावरील प्रत्येक वाहन, पादचारी आपला शत्रू आहे या पद्धतीने तो अतिशय वेगात गाडी चालवत सॉरी हाकत होता. केवळ पोलीसांची गाडी असल्याने ते वाचले म्हणायला हरकत नाहीं. अवघ्या दहा मिनिटातच ते पोचले. सुटलो असा एका सुस्कारा सोडत फादर गाडीतून उतरले.

“आपण प्रथम ऑफिसमधे . . . .”फादर म्हणाले.

“सर्वप्रथम कन्फेशन बॉक्स बघूया.”जॉनी त्यांचे वाक्य अर्ध्यात तोडत म्हणाला.

तिघेही कन्फेशन बॉक्सपर्यंत गेले. तिथून मेन गेट स्पष्ट दिसत होते.

“फादर झालेली घटना आपण परत एकदा करून बघू.”

“म्हणजे?”

“म्हणजे असे की तुम्ही कन्फेशन ऐकायला बसा. अजय बॉक्समधे बसेल . त्याच्याजवळ स्टेटमेंट आहेच. तो वाचायला सुरु करेल आणि बॉक्स बाहेर येऊन गेटकडे जाईल. तुम्ही पण सकाळसारखेच बाहेर येऊन त्याचा शोध घ्या.”

काहीश्या नाखुशीनेच फादर कन्फेशन बॉक्समधे बसले. अजय कन्फेशन वाचू लागला. बाहेर पडल्यावर तो धीम्या गतीने मेन गेटकडे पळत गेला. फादर बॉक्सच्या बाहेर आले तेव्हा धीम्या गतीने पळत असून देखील अजय चर्चच्या आवारातच स्पष्ट दिसत होता. मेन गेट तरीपण पंचवीस तीस फूट दूर होते. फादर

ते बघून चक्रावले. म्हणजे पळत गेला तरी माणूस जेमतेम गेटपर्यंत जातो. मग मला कसा दिसला नाही. ते विचार करू लागले. तेवढ्यात जॉनीने विचारले,

“परत एक रिहर्सल करुया फादर?” उत्तराची वाट न बघता त्याने अजयला हळू आवाजात एक सूचना दिली. या वेळी फादर बाहेर आले तेंव्हा त्यांना अजय दिसला नाही.

“जॉनी, अजय कुठे गेला?”त्यांनी विचारले. जॉनी त्यांना घेऊन चर्चच्या डाव्या बाजूला गेला. तिथे त्यांना अजय दिसला.

“सरळ न जाता ती व्यक्ती डाव्या बाजूला गेल्याने तुम्हाला दिसली नाही.”

“पण तिकडे तर ग्रेव्हयार्ड आहे. तिथे जायला एक फाटक आहे आणि त्याला कुलूप असते.”

“सर, इकडे या.” तेवढ्यात अजयने बोलावले. दोघेही अजयजवळ जाताच त्यांना दिसले की फाटक उघडे आहे.

“ती व्यक्ती या फाटकामधून ग्रेव्हयार्डमधे गेली व तिथून बाहेर. आज दफनविधी होता काय?”

“अकरा वाजता होता”

“बरोबर. मग तो त्या गर्दीत मिसळून बाहेर गेला.” जॉनी म्हणाला.

“सर,तो दफनविधी करताच आला असेल तर?”अजय म्हणाला.

“व्हेरी गुड. असेही असू शकते. म्हणजे त्याला कोणीतरी बघितला असण्याची शक्यता आहे. फादर, दफनविधी कोणी केला?”

“फादर स्मिथ. मी बोलवतो.” फादर फोन करत म्हणाले. त्यांना आता जॉनीचे काम आवडायला आणि पटायला लागले होते. पाच मिनिटात स्मिथ आले.

“फादर,तुम्ही आजचा दफनविधी केला?” जॉनीने विचारले.

“होय.”

“किती वेळ लागला?”

“अकरा ते तीन.”

“या दरम्यान तुम्हाला कोणी व्यक्ती चर्चकडे जातांना दिसली?”

“नाही. म्हणजे माझे लक्ष नव्हते.”

“ठीक आहे पण कोणी व्यक्ती जरा वेगळी वागत आहे असे वाटले, दिसले?”

क्षणभर विचार करून स्मिथ म्हणाले, “नाही. पण एक मिनिट. एक व्यक्ती त्या टोकाला गेलेली दिसली. बरेच लोक दफनविधीला आले असता वेळ असेल तर जुन्या कबरींना भेट देतात म्हणून मी लक्ष दिले नाही.”

“काही हरकत नाही. तुम्ही त्याचे वर्णन करू शकता?”

“सॉरी. अंतर फार होते आणि माझे काम सुरु होते.”

“ठीक आहे. तो अंदाजे कुठे उभा होता?” फादरने हात दर्शवून जागा दाखवली.

त्यांचे आभार मानून जॉनीने त्यांना जायला सांगितले. अजयला तिकडे बघायला सांगून जॉनी फादर बरोबर त्या दिशेला एक एक कबर निरखत जाऊ लागला. तेवढ्यात दुरून अजयने आवाज देऊन बोलावले. त्याच्यापाशी जाताच त्याने बाजूच्या कबरीकडे बोट दाखवले.

त्या कबरीसमोरील गवत थोडे दबल्यासारखे दिसत होते. बाजूची एकदोन रोपटी उपटून त्यानीच कबर नुकतीच स्वच्छ केलेली दिसत होती. आजूबाजूची रानटी फुले तोडून कबरीवर वाहिलेली दिसत होती. कबरीवर ‘ डॉ. रूथ डेव्हिड डिकॉस्टा एप्रिल. 5,1980 – नोव्हेंबर 10, 2008’ एवढेच साध्या अक्षरात लिहिले होते.

“बरोबर.” अजयला शाबासकी देत जॉनी म्हणाला, “आपला माणूस दफनविधी करता आला. त्याला रूथ बद्दल आधीच माहिती असेल किंवा इथेच मिळाली असेल. ती मिळताच त्याने प्रथम दुःखावेगाने कबर शोधली, फुले वाहिली नंतर दुःखाचे रुपांतर संतापात झाले असेल आणि तो कंफेशन बॉक्स मधे गेला. फादरशी बोलल्यावर परत दफनविधीच्या गर्दीत मिसळला आणि बाहेर गेला.”

जॉनीच्या प्रत्येक वाक्याबरोबर अजयचा जॉनीबद्दलचा आदर वाढत होता. फादर पण जॉनीची विचारशक्ती बघून चकित झाले होते. समोर जे दिसत होते, घडत होते, त्यावर विश्वास ठेवणे तर भाग होते. थोडेसे भानावर येत त्यांनी विचारले, “जॉनी ते ठीक आहे पण अजूनही आपल्याकडे ठोस माहिती नाही.”

"ती ही रूथ आपल्याला देईल. तिची माहिती काढल्यावर त्या गोष्टी समजतील. अजय, या कबरीचे आणि आजूबाजूच्या पाच सहा कबरीचे स्नॅपशॉट घे. फादर,याचे रेकॉर्ड चर्चकडे असेलच. ते द्या."

"हो जरूर मी अब्राहमला सांगतो. पण संभाव्य खुन्या बद्दल तुझा काही अंदाज?"

"तो वयाने तीस-पस्तीशीच्या घरातला असावा." जॉनी म्हणाला. "साधारणपणे माझ्यासारखा असावा."

"त्याला या चर्चची पूर्ण माहिती असावी." अजयने पुस्ती जोडली.

"कशावरून?" फादरनी विचारले.

"ग्रेव्हयार्डमधून चर्चला रस्ता आहे हे एखाद्या माहितगारालाच माहिती असू शकते. कन्फेशन बॉक्स पर्यंत एवढ्या गतीने येणेजाणे माहिती असलेला माणूसच करू शकतो." अजयने स्पष्टीकरण दिले.

एव्हाना ते तिघेही चर्चच्या ऑफिसमधे आले होते. तिथे पोचल्याबरोबर फादरनी अब्राहमला बोलावून आजच्या दफनविधीसह सातही फोटोचे रेकॉर्ड मागितले. ते बघायला तयार करायला थोडा वेळ असल्याने ते जॉनी आणि अजयबरोबर ऑफिसमधे बसले. अजयने सर्व फोटो पोलीस कॉम्प्युटर सेलला पाठवले आणि डेटा मागितला. वरकरणी बेफिकीर वाटणारे हे दोघेही किती बारकाईने आणि सफाईने काम करतात हे अनुभवल्याने फादर चकित झाले होते.

तेवढ्यात जॉनीने विचारले, “हे सर्व रेकॉर्ड आता कॉम्प्युटराईज झाले असतील?”

“मागील वर्षापर्यंत झाले आहे. सहा महिन्यात उरलेले पूर्ण होईल.” नंतर त्यांनी स्वतःच्या मनातला प्रश्न विचारला, “जॉनी, त्या व्यक्तीला कसे पकडणार?”

जॉनीने आश्चर्याने विचारले, “त्याला कशाला पकडायचे?”

“म्हणजे? त्याने आधीच कृती केली तर?” फादर खून शब्द वापरायला अजूनही तयार नव्हते.

“ती शक्यता गृहीत धरूनच काम करावे लागणार आहे. हा जो कोणी असेल तो फार हुशार आहे हे नक्की. असेही वाटते की आपण काय करू हे पण तो तर्काने सहज जाणत असेल.”

“मग तो काही करण्याची आपण वाट बघायची?”

“नाही. तो ज्यांचे खून करण्याची संभावना आहे त्यांच्यावर लक्ष ठेवायचे. तो काय करेल याचा अंदाज घेऊन आपण त्याच्यापेक्षा जलद हालचाल केली पाहिजे हा एक ऑप्शन आहे.”

“आणि दुसरा?” फादर आणि अजयने अधीरतेने विचारले.

” दुसरा ऑप्शन हाच की आपल्याला दुसरा ऑप्शन नाही.” जॉनी हसत म्हणाला,”फादर, आमचे इथले काम झाले आहे. अजून काही लागल्यास आम्ही परत येऊ. तोपर्यंत तुम्ही त्या व्यक्तीसारखा कोणाचा आवाज आहे हे

आठवायचा प्रयत्न करा कारण त्याचा आवाज फक्त तुम्हीच ऐकला आहे. रात्री बेरात्री केव्हाही अजून काही आठवले तर ताबडतोब फोन करा. आम्ही येतो आता.” असे म्हणत दोघेही जायला उठले.

त्यांना निरोप द्यायला फादर उठले आणि मनापासून म्हणाले, “जॉनी आणि अजय,तुम्हा दोघांबद्दल मला या आधी काही खात्री वाटत नव्हती पण आतापर्यंतचे तुमचे काम बघून मला खात्रीने वाटते की तुम्ही या केसचा छडा लावाल . जॉनी वेळ मिळेल तेव्हा चर्चमधे येत जा.”

“पुरे फादर, आमच्याबद्दल एवढे चांगले ऐकायची आम्हाला सवय नाही.”जॉनी हसत म्हणाला,“तरीपण मी चर्चमधे जरूर येईन,होपफुली प्रार्थनेसाठी.”

-----------*---------

# प्रकरण ४

चर्चमधून ते थेट मुख्यालयात कॉम्प्युटर सेलला गेले.

सेलमधून त्यांना हवी असलेली सर्व माहिती तयार होती. ती त्यांनी मेल केली शिवाय हार्ड कॉपीज दिल्या. दोघेही जॉनीच्या केबिनमध्ये बसून रिपोर्ट वाचू लागले.

“अजय, तुला या सर्व रिपोर्टमधे काही साम्य वाटते काय? जॉनीने विचारले.

अजयने पण सर्व रिपोर्ट नीट वाचले होते. तो लगेच म्हणाला, “सर्व केसेस नवजीवन हॉस्पिटलच्या आहेत. अगदी रूथची पण.”

“अजून?”

“सर्व पंचवीस ते पस्तीस वयोगटातील आहेत. सर्व किडनी पेशंट होते. साधारणपणे दोन वर्षात सर्व मृत्यू झाले आहेत.”

“अजून?”

अजयने सर्व पेपर्स परत चाळले. त्याला काही आढळले नाही.

“अजून काय?”

“रूथ सोडल्यास सगळे एकटे राहणारे होते. सडाफटिंग म्हणले तरी चालेल.”

“खरच की.”

"म्हणूनच त्यांच्या मृत्यूबाबत काही विचारणा झाली नाही. चौकशी नाही. असला तर एखादा दूरचा नातेवाईक असेल म्हणून त्यांनी काही विचारले नाही. फक्त रुथची केस वेगळी आहे. तिच्या पतीने डॉक्टरांना मारहाण केली. तुम्ही तिचा खून केला असा आरोप केला. केस झाली ."

"हा सर्व बनाव आहे असे तुम्हाला वाटते काय? पण कोर्टाने डॉक्टरांना निर्दोष ठरवले आहे."

"समोर आलेले पुरावे आणि आरोपीचा वकील कसा युक्तिवाद करतो यावर न्यायाधीश निर्णय देतात. याचा अर्थ आरोपी निर्दोष असतोच असा नाही."

आता जॉनीचे वेगळेपण अजयला जाणवू आणि पटू लागले होते. त्याने पटकन उभे राहून फाईल घेतली आणि म्हणाला, "मग चला. नवजीवन हॉस्पिटलला जाऊ."

नवजीवन हॉस्पिटल हे शहरातील जुने आणि नावाजलेले हॉस्पिटल होते. चार भव्य आठमजली इमारती, त्यात वेगवेगळे विभाग, ओपीडी, लॅबज,असा मोठा पसारा होता. तळमजल्यावर स्वागतकक्षात अजयने ॲडमिनचे हेड कोण आणि कुठे भेटतील हे विचारले.

"डॉ. गौरी प्रधान. ही डावीकडची केबिन."फोन लावत नर्स म्हणाली, "काय काम आहे?"

"काम त्यांनाच सांगू." असे म्हणत अजय आणि जॉनी चालू लागले आणि दुसऱ्या मिनिटाला गौरीच्या समोर ठाकले. गौरी प्रधान साधारण चाळीशीची

असावी. गोरा वर्ण,सडपातळ,सोनेरी बारीक काड्यांचा चष्मा, चेहऱ्यावर विद्वत्तेचे तेज आणि चेहऱ्यावर 'नो नॉनसेन्स' भाव. ती फोनवर होती. बहुधा नर्सशी बोलत असावी. या दोघांची चाहूल लागताच तिने फोन ठेवला आणि विचारले, "आपण?"

दिवसभरात या दोघांना प्रश्न विचारणारी ती पहिलीच व्यक्ती असावी.

आपले आयकार्ड तिच्यासमोर धरत अजय म्हणाला, "मी इन्स्पेक्टर अजय देशमुख आणि हे माझे साहेब, एसीपी. जॉनी मेंडोझा."

'एसीपी. जॉनी मेंडोझा' हे नाव ऐकताच गौरीच्या चेहऱ्यावरचे त्रासिक भाव क्षणार्धात नष्ट झाले आणि काहीश्या आनंदाने आणि कुतूहलाने तिने विचारले, "म्हणजे ते. . . ?"

जॉनीला अश्या प्रतिक्रियांची सवय होती. तो गौरीचे वाक्य अर्ध्यातच तोडत म्हणाला,

"तो मीच. आत्ता आम्हाला जरा माहिती पाहिजे आहे."

हातातील नावे लिहिलेला पेपर तिला देत तो म्हणाला, "हे सर्व इथले पेशंट होते. त्यांच्या केस फाईल्स मला पाहिजेत आणि त्याही आत्ताच."

पेपर वाचत गौरी शेवटच्या नावापाशी आली आणि तिने चमकून वर बघितले.

"रूथची केस तुम्ही रिओपन करणार आहात?"

"अजूनतरी तसे काही ठरवले नाही पण सांगू शकत नाही."

त्यावर काही न बोलता तिने भराभर नावे टाईप केली प्रिंटची ऑर्डर दिली.

“प्रिंटला वीस मिनिटे तरी लागतील.” ती म्हणाली.

“त्याऐवजी ई-मेल केल्या असत्या तर?” अजय म्हणाला.

“ई-मेल डिलीट केल्या तरी रेकॉर्डवर राहतात आणि कोणाला केल्या ते सहज शोधता येते .” गौरी शांतपणे म्हणाली.

“तुम्ही रूथला ओळखत होता?” जॉनीने विचारले.

“तशी मी इथे नवीनच आहे. मी आल्यावर तीन महिन्यांनी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. माझ्यापेक्षा लहान होती ती पण आमचे चांगले जमायचे.”

“ती काही बोलायची काय तुमच्यापाशी?”

“आमच्या बोलण्यात ओझरता उल्लेख यायचा कधी कधी.”

“इथे जे काही चालले होते त्याबद्दल?” जॉनीने हातातील कागद फडकवत विचारले.

गौरीने होकारार्थी मान हलवली.

“मग तुम्ही काही प्रयत्न केला नाही तिला सावध करणण्याचा, थांबवण्याचा?”

“तेवढे ती कधी बोलली नाही. मी आडून थोडा प्रयत्न केला. तशी ती फार मनस्वी होती. माझेच चुकले मी तिच्याशी अजून बोलायला पाहिजे होते.” गौरी खिन्नपणे म्हणाली.

“जाऊ द्या. आता विचार करून काय उपयोग?” जॉनी म्हणाला.

“खरे आहे. म्हणून तुमच्यासारखे चाकोरीबाहेर जाऊन काम करणारे बघितले की उर भरून येतो. अधिकार तर बऱ्याच जणांकडे असतात हो पण निडरपणे वापरणारे फार थोडे.”

तेवढ्यात प्रिंटिंग पूर्ण झाल्याचा अलार्म वाजला. गौरीने पेपर्स गोळा केले अजयकडे दिले आणि आभार मानून दोघेही निघाले.

बाहेर येताच अजय जॉनीला म्हणाला, “लॉजिक प्रमाणे इथवर ठीक आहे पण अजून ते तिघे कोण हे आपण ठामपणे सांगू शकत नाही.”

“ज्याअर्थी दफनविधी चालू असतांच रुथबद्दल माहिती मिळाल्यावर ती व्यक्ती पेटून उठली त्याअर्थी हो न हो नवजीवन हॉस्पिटलशीच हे संबंधीत आहे. सातही किडनी पेशंट आणि आठवी रूथ यांचे ऑपरेशन करणारे ठराविक दोनच डॉक्टर असावेत हे खटकते.”

“तरी पण तिसरा कोण?”

“त्यांचा वकील. अजून कोण? आज रात्रीच पहिला खून व्हायची दाट शक्यता आहे. तो जर आपण थांबवू शकलो तर आपला तपास योग्य दिशेने चालू आहे असे म्हणावे लागेल.”

बोलता बोलता एव्हाना ते आयुक्त कार्यालयात पोचले होते. त्यांना बघताच नीलाने सरळ आत जाण्याची खूण केली. दुसऱ्या मिनिटाला ते आयुक्तासमोर उभे होते.

त्यांना बसण्याची खूण करत आयुक्त म्हणाले,“बोला.”

जॉनीने थोडक्यात सर्व सांगितले. त्यांनी पण तोच प्रश्न केला जो अजयने थोड्या वेळापूर्वी केला होता.

“त्याकरता मला या लोकांवर पाळत ठेवावी लागेल.”

“त्याने काय साध्य होणार?”

“त्यांना जर काही झाले नाही आणि दुसरीकडेपण खून पडले नाहीत तर आपला तर्क बरोबर. कारण आपल्या हालचाली बघून कदाचित त्या व्यक्तीने प्लॅन पुढे ढकलला असे म्हणता येईल. आपल्याला अजून पाळत ठेवावी लागेल.”

थोडा विचार करून आयुक्त म्हणाले, “बरोबर. पण काही झाले तर?”

“त्यांना काही झाले आणि दुसरीकडे काही झाले नाही. तरी आपण बरोबर.”

“पण त्यांना काही झाले आणि दुसरीकडेपण काही झाले तर?”

“दुसऱ्या केसेसचा याच्याशी काही संबंध आहे का हे तपासून आपण बरोबर की चूक हे बघू शकतो.”

“ठीक आहे.”आयुक्त हसून म्हणाले, “गो अहेड.”

दोघेही उठले आणि जायला लागले. ते बाहेर पडणार तोच आयुक्त मागून मिश्किलपणे म्हणाले,

“जॉनी, सर्वजण जिवंत राहतील याची काळजी घे बर का.”

आपण दिवसभर जरी जॉनी बरोबर काम करत असलो तरी विचार करण्याच्या बाबतीत जॉनी फारच गतिमान आहे हे एव्हाना अजयला उमगले होते. त्यामुळे नकळत तो जॉनीला सर म्हणू लागला होता.

“सर, आता पुढे?”अजयने विचारले.

“आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे पाळत ठेवणे. त्यामुळे आपल्याला एकदोन दिवस वेळ मिळू शकतो.” “आपल्याकडे तर दोनच अंदाजे नावे आहेत. तिसरा वकील असू शकेल.”

क्षणभर विचार करत जॉनी म्हणाला, “धरून चलू. त्या व्यक्तीला ही माहिती ग्रेव्हयार्ड मध्ये मिळाली म्हणजे तो इथला राहणारा नाही.”

“किंवा इथला राहणारा असेल आणि बऱ्याच कालावधीनंतर आला असेल.” अजयने तर्क केला.

“तसेही असू शकते. मग त्याला एवढी डिटेल माहिती कोणी दिली असेल?”

“डेव्हिड. पण तो तर वेड्यांच्या इस्पितळात आहे आणि तो जर वेडा आहे तर माहिती कशी देईल?”

“जर वेडा असला तर !” प्रत्येक शब्दावर जोर देत जॉनी म्हणाला.

“प्रथम त्याला भेटू. या तिघांवर लक्ष ठेवायला एक माणूस ठेव. चल.”

# प्रकरण ५

बाहेर येताच अजयला गाडी वेड्याच्या इस्पितळाकडे घ्यायला सांगितली.

“डेव्हिड डिकॉस्टा. त्याला भेटून काही उपयोग होणार नाही.” वेड्यांच्या इस्पितळाचे प्रमुख,डॉ. दीक्षित म्हणाले .

“का?”

“तो कोणाशीही बोलत नाही. व्होलटाईल नाही एवढेच पण संपर्क कोणाशीही नाही.”

“भेटून तर बघू.”

‘जशी तुमची इच्छा’ असे म्हणून त्यांनी एका वार्डबॉयला बोलावले आणि यांना डेव्हिडकडे घेऊन जा असे सांगितले . वार्डबॉयने त्यांना डेव्हिडकडे नेले,दार उघडले आणि काही लागल्यास सांगा मी इथेच आहे असे सांगून तो बाहेर थांबला. डेव्हिड खिडकीबाहेर बघत होता. दार उघडण्याचा, बोलण्याचा आवाज आला तरी त्याने दखल घेतली नाही किंवा वळून पण बघितले नाही.

“डेव्हिड, मी जॉनी मेंडोंझा.”

प्रतिसाद शून्य.

“मला कल्पना आहे तुला काय वाटत असेल याची.”

प्रतिसाद शून्य.

"मला सांग त्या दिवशी ऑपरेशन रूममधे नक्की काय घडले?"

प्रतिसाद शून्य.

असेच दोन तीन प्रश्न अजयने पण विचारले पण डेव्हिडने कसलाही प्रतिसाद दिला नाही. दहा मिनिटांनी दोघांनी कंटाळून नाद सोडला.

"अजून कोणी याला भेटले काय?"

"फादर दिब्रिटो येतात दर रविवारी. त्यांच्याशीपण तो बोलत नाही."

डॉक्टरांचे आभार मानून दोघेही बाहेर पडले.

नंतर दोघेही भरपेट जेवले. जेवण करत असतांना जॉनीने केसचे नाव पण काढले नाही पण जेवण झाल्याबरोबर म्हणाला, "चला,डॉ. सतीश मेहताची भेट घेऊ."

डॉ सतीश एक नावाजलेले सर्जन होते. साठीच्या जवळपास असलेले डॉक्टर एकटेच एका आलिशान सोसायटीत रहात होते. पत्नी निवर्तली होती. मुले परदेशी स्थायिक झाली होती. नवजीवन हॉस्पिटलचे अर्ध्वयू म्हणून ओळखले जाणारे डॉ. सतीश हॉस्पिटल सोडून इतर सामाजिक कार्यक्रमात सहसा जात नसत. त्यांचा, जनतासंपर्क जवळपास शून्य होता. रात्री साडेदहाच्या सुमारास जॉनीने त्यांच्या घराची बेल वाजवली. पाच मिनिटांनी डॉक्टरांनी स्वतःच दार उघडले आणि जॉनी कडे प्रश्नार्थक मुद्रेने बघितले. जॉनी आयकार्ड दाखवत म्हणाला. "पोलीस."

काहीश्या नाखुशीने त्यांनी दार उघडले आणि दोघांनाही आत घेतले. त्यांना बसण्याची खूण करत. ते म्हणाले की तुम्ही भेटण्यासाठी वेळ फार चुकीची निवडलीआहे. जॉनीने का म्हणून विचारताच त्यांनी टीपॉय कडे इशारा केला. त्यावर पेयपान सुरु असल्याच्या खुणा होत्या.

“किती राउंड झाले?”जॉनीने विचारले.

“दोन.”त्यावर जॉनीने चार बोटे त्यांच्यासमोर धरली आणि विचारले, “हे किती?”

“चार.”

“एवढी शुद्ध माझ्या दृष्टीने पुरेशी आहे.” जॉनी सोफ्यावर आरामात बसत म्हणाला, “माझे बोलणे ऐकल्यावर तुमची नशा पूर्ण उतरेल.”

“एवढे काय सांगणार आहात तुम्ही?”

“हेच की तुमचा जीव धोक्यात आहे.”

“कोण माझा जीव घेणार आहे? कुणापासून मला धोका आहे?”

“ती माहिती अजून मिळाली नाही, पण तुम्हीच विचार करा तुम्हाला कोणापासून धोका आहे ते.” सतीशनी एका दमात ग्लास रिता केला. वरवर कितीही बेपर्वाई दाखवत असले तरी कपाळावर घाम आला होता.

“पोलिसांनी मला संरक्षण द्यायला हवे.”

“निरपराध नागरिकांचे संरक्षण पोलीस करतात. गुन्हेगारांचे नाही.” जॉनी ठामपणे म्हणाला.

“पण रूथच्या केसमधे कोर्टाने मला निर्दोष सोडले आहे.”

जॉनी आणि अजयने चमकून एकमेकाकडे बघितले.

“मी तर रूथचे नावपण घेतले नाही.” जॉनी म्हणाला. “कोर्टात निर्दोष सुटला याचा अर्थ तुम्ही निर्दोष आहातच असा होत नाही पण आपण वाद घालण्यात काही अर्थ नाही. तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते ती व्यक्ती खून करायला येईल तेंव्हा त्याच्याशी बोला अर्थात् त्याने बोलू दिले तर. तसे तुम्हाला सावध करणे आमचे कर्तव्य होते ते आम्हीं केले. तसेही आमचा एक माणूस संरक्षणासाठी आहे.”

हे ऐकल्यावर सतीशला जरा हायसे वाटले.

“मी सकाळी सहा वाजता परत तुम्हाला भेटायला येईन. होपफुली आपण भेटू.”असे यांत्रिकपणे म्हणून सतीशच्या प्रतिक्रियेची वाट न बघता दोघेही बाहेर पडले.

“चला आता डॉ. गोपाल शर्माची भेट घेऊ.” जॉनी म्हणाला. डॉ गोपाल शर्मा तुलनेनी जास्त सुरक्षित वातावरणात होते. त्यांच्या सोसायटीत सुरक्षारक्षकाकडे नोंद केल्याशिवाय प्रवेश नव्हता. त्यांनापण योग्य सूचना देऊन जॉनी अजयला म्हणाला आता आपल्या यादीतल्या शेवटच्या भिडूला भेटू या.

“”एकदम बरोबर. बरे झाले आठवण केली. त्यालापण भेटू.”

अँडव्होकेट सुनील घाटे हे शहरातील प्रसिद्ध वकील होते. तुम्ही खून केला तरी मला तसे खरे सांगा. तुम्हाला निर्दोष सोडविण्याची जबाबदारी माझी हे

त्यांचे ब्रीदवाक्य होते. त्याकरता भल्या बुऱ्या मार्गाचा अवलंब करण्यात त्यांना काहीही गैर वाटत नसे. मी नाही तर दुसरा कोणी हेच करून पैसे कमवेल मग मीच केले तर काय वाईट असे ते उघडपणे बोलून दाखवत. अशा माणसाला आपल्या ऑफिसमधे जॉनी आणि अजयला आलेले बघून आश्चर्य वाटले आणि त्यांनी ते अजिबात लपवले नाही.

“ओ हो हो. आज काय आमचे नशीब उघडले म्हणावे की दिवस भरले म्हणावे?” ते तिरकसपणे म्हणाले. हा टोला जॉनीच्या एनकाउंटर प्रसिद्धीला उद्देशून होता. जॉनीचे यांच्याशी अजिबात पटत नसे. ही गोष्ट जगजाहीर होती.

“काहीही समजा. सावध रहा म्हणून सांगायला आलो आहे.”

“असे काय केले मी?”

थोडक्यात सर्व सांगून जॉनी म्हणाला,” माझ्या अंदाजानुसार तुम्ही पण त्याच्या हिट लिस्टवर आहात.”

“पण माझा काय संबंध येतो? माझ्या अशिलाने जे पुरावे दिले ते मी योग्य प्रकारे न्यायालयात मांडले आणि ते निर्दोष सुटले यात माझा काय दोष?”

“तो प्रत्यक्ष भेटेल तेंव्हा त्याला समजावून सांगा.” जॉनी तुटकपणे म्हणाला, “अर्थात त्याने बोलू दिले तर.”

“पोलिसांना वर्दीतले गुन्हेगार म्हणतात ते काही खोटे नाही.”

“वकील या शब्दाचा लाँगफॉर्म यापेक्षाही खराब आहे.”

“जॉनी, तुझे मराठी खूप छान आहे हे मला माहीत आहे पण वकील हा शब्द आहे. तो लाँगफॉर्मच्या अक्षरांनी बनलेला नाही.”

“का नाही? व म्हणजे वटवट्या, की म्हणजे किरकिऱ्या आणि ल म्हणजे लबाड.” जॉनी अजयला बाहेर चलण्याची खूण करत म्हणाला. बाहेर पडताच अजय म्हणाला, “वकील शब्दाची ही फोड तर मलापण माहिती नव्हती. तुमचे मराठी खरच फार छान आहे.”

“त्यात काय विशेष? माझी पत्नी पुण्याची आहे.” गाडीत बसत जॉनी म्हणाला. थोडा वेळ दोघेही शांत बसले. नंतर काही आठवल्यासारखे करून जॉनी म्हणाला, “अजून एक सांगायचे राहिले. गस्तीच्या गाडीला या तिघांच्याही घरावरून जातांना सायरन वाजवत जायला सांग.”

हा माणूस काही विसरणे अशक्य आहे असा विचार करत अजयने सूचना दिली आणि अजून काही या अपेक्षेने जॉनीकडे बघितले. जॉनीने जणूकाही त्याच्या मनातले ओळखले आणि नकारार्थी मान हलवली. एक समाधानाचा सुस्कारा सोडत अजयने गाडी सुरू केली.

“सर, तुम्हाला आधी घरी सोडतो.”

“कशाला? तुझे घर जवळ आहे. तुला सोडून मी गाडी घेऊन जाईन.”

चालेल म्हणत अजयने अर्ध्या तासात घर गाठले. घराजवळ थांबल्यावर त्याने जॉनीला कॉफिकरता आग्रह केला पण नंतर जरूर येईन म्हणत जॉनीने गाडीचा ताबा घेतला आणि निरोप घेतला.

# प्रकरण ६

सकाळी सहा वाजता जॉनीने प्रथम कन्ट्रोल रुमला फोन करून बातम्या विचारल्या. कोणतीही मोठी घटना झालेली नाही हे कळल्यावर समाधानाचा निःश्वास सोडला. नंतर अजयला शर्मांचा हालहवाल विचारायला सांगितले आणि स्वतः मेहताकडे गेला. बेल वाजवल्याबरोबर मेहतांनी दार उघडले, त्यांच्या अवतारावरून ते झोपले नसावेत हे दिसत होतेच.

“काही शोध लागला का?” त्यांनी अधिरतेने विचारले.

“नाही.” जॉनी शांतपणे म्हणाला.

“ दिवसा काही झाले तर?” मेहता घाबरून म्हणाले.

“आजच्या दिवस तुमच्या संरक्षणाकरता एक माणूस बोलावतो. किती दिवस अजून द्यायचे ते आयुक्त ठरवतील.” जॉनी रुक्षपणे म्हणाला.

“फार चांगले होईल. मी आयुक्तांनापण तसे सांगतो. तोवर आपण चहा घेऊ.”

रात्र सुरळीत पार पडल्याने मेहतांना जरा विश्वास आला होता. त्यांनी लगेच आयुक्तांना फोन लावला. जॉनीने खूप सहकार्य केल्याचे सांगून अजून काही दिवस हीच व्यवस्था चालू ठेवण्याची विनंती केली. आयुक्तानी बहुतेक नंतर कळवतो म्हणून बोळवण केली असावी कारण बोलणे संपल्यावर ते काहीच बोलले नाही.

तिथून जॉनी थेट कार्यालयात गेला. तासाभरात अजयपण आला. दोघेही आढावा घेत असतांना आयुक्तांनी बोलावले.

“गुड जॉब.” त्यांनी सुरवात केली. “पण एवढ्यावरच समाधान मानू नका. आता एक दिवस हाती मिळाला आहे तर रूथचा इतिहास आणि ती सुनंदा नर्स कुठे गायब झाली हे शोधून काढा आणि जॉनी डॉक्टर मेहतांना कळव की अजून आठ दिवस ही गस्त चालू राहील. दिवसा संरक्षण द्यायची गरज नाही. गुड डे.”

बाहेर येताच अजयते भराभर फोन करायला सुरवात केली. एक दोन फोन झाल्यावर जॉनीने थांब म्हणून खूण केली आणि विचारले, “काय करतोस?”

“सुनंदाचा तपास. सर्व हॉस्पिटल मध्ये फोन करून या नावाची कोणी नर्स जॉईन झाली आहे का ते विचारतो किंवा जॉईन झाली तर कळवायला सांगतो.”

“आपल्याला बॉसनी जर एखादे काम सांगितले तर ते आपण ताबडतोब करायला पाहिजे हे बरोबर आहे. पण तेच काम जर आपण स्मार्टली करु शकत असलो तर बरीच एनर्जी वाचू शकते.”

“ते कसे?”

“जरा विचार करून काम केल्यास. थोडा विचार कर. शोधायचे कोणाला? सुनंदाला. सुनंदा कोण? एक कुशल प्रशिक्षित नर्स. ऑपरेशन थिएटर आणि आय सी यू मधे काम करणारी. इतकी क्वॉलिफाईड नर्स मोठया हॉस्पिटलमधेच काम करणार. नर्सेसचा इतका तुटवडा आहे की सरकारने प्रत्येक राज्यात ‘स्टेट नर्सिंग ब्युरो' स्थापन केले आहे. त्यामधे प्रत्येक नर्सला नोंदणी करणे, सध्याचे

कामाचे ठिकाण नोंदविणे बंधनकारक केले आहे. ही माहिती कॉम्पुटराईज असून सर्व राज्यात शेअर केली जाते.”

अजय चकित होऊन ऐकत होता.

“मग गुरु ही कोणत्या शहरात असेल हे पण अनुमानशास्त्राने सांगा.”

“माझ्या अंदाजाने ती पुण्यात असावी.”

अजयने ताबडतोब नर्सिंग ब्युरोला फोन केला. दहा मिनिटातच सुनंदाची पूर्ण कुंडली त्याच्या मेलवर आली. ती वाचताच त्याने जॉनीला विचारले, “ती पुण्यात असेल हे असे तुम्हाला का वाटले?”

“त्याला दोन कारणे आहेत.” जॉनी उसन्या गांभीर्याने म्हणाला. “

“कोणती?”

“एक तर ती कोल्हापूरची आहे म्हणजे पुणे तिला जवळ आहे.”

“आणि दुसरे कारण?”

“रोमा सध्या पुण्याला आहे.”

यावार दोघेही खळाळून हसले.

“अडीचची फ्लाईट आहे. मला निघायला हवे.”

“हे सर्व तुम्हाला कोणी सांगितले? शिकवले.” न राहवून अजयने विचारलेच.

आयुक्तांच्या केबिनकडे बोट करून जॉनी म्हणाला, “त्यांनी आणि पुस्तकांनी. वाचाल तेवढे कमीच असते. बर,दोन दिवस इथली बाजू सांभाळ. काही घडलेच तर मला लगेच कळव.”

चार वाजता जॉनी पुण्याला घरी पोहचला. त्याला बघून रोमाला जरा नवल वाटले तरी तिने तसे दर्शविले नाही कारण ती पोलिसाची पत्नी होती. आपला पती आठ ते पाच या पठडीतला नाही हे तिने आधीच गृहीत धरले होते. त्यामुळे राग लोभाचा प्रश्नच नव्हता. तो दिवसतरी त्यांनी पुरेपूर एन्जॉय केला. दुसऱ्या दिवशी सकाळी दहालाच जॉनी रुबी नर्सिंग हॉस्पिटलला पोचला. स्वागतकक्षावर त्याने आपला परिचय देऊन सुनंदा यांना भेटायचे आहे म्हणून सांगितले. दहा मिनिटातच सुनंदा आली. साधारणपणे चाळीशीच्या आसपास असलेली सुनंदाचे व्यक्तिमत्व छाप पाडणारे होते. राहणीमान अर्थातच नीटनेटके आणि टापटिपीचे होते.

“आपण?” तिने विचारले. जॉनीचे थोडक्यात स्वतःची ओळख आणि भेटीचे कारण सांगितले.

“आपण कॅन्टीनमधे बसून बोलीया.” तिने सुचविले.

जॉनीची अर्थात काहीच हरकत नव्हती. कॅन्टीनमधे बसल्यावर, ऑर्डर देऊन झाल्यावर तिने काही विचारायच्या आत रुथची केस रिओपन वगैरे करण्यासाठी मी इथे आलो नाही असा जॉनीने खुलासा केला.

“मग?”

"उलट या केसमधील काहीजणांच्या जिवाला धोका आहे अशी माहिती पोलीसांना मिळाली आहे. त्यासंबंधाने मी चौकशी करत आहे."

"एवढेच कारण आहे?" तिने त्याच्याकडे रोखून बघत विचारले. तिच्या नजरेला नजर देणे शक्य न झाल्याने जॉनीने नजर झुकवली.

"पोलीस डिपार्टमेन्टमधे जे काही थोड़े लोक स्वतःशी प्रामाणिक राहून काम करतात त्यातले तुम्ही एक आहात. हे मला माहीत आहे म्हणून मी तुम्हाला अजून काही विचारत नाही. तुम्ही विचारा तुम्हाला काय विचारायचे ते."

"तुम्ही खरेतर महत्वाच्या साक्षीदार होत्या. पण ऑपरेशन संपल्यावर तुम्ही ज्या नाहिश्या झाल्या त्या दिसल्याच नाही. पोलिसानी तुम्हाला शोधले नाही? नक्की काय झाले?"

"ऑपरेशननंतर जी डेव्हिडने आत घुसून मारामारी त्यावेळीस मी तेथे नव्हती म्हणून पोलिसांनी मला शोधले नसेल."

"पटत नाही. तुम्ही नंतर नोकरीपण सोडली. काय झाले ते सविस्तर सांगा."

"ठीक आहे. रूथने हॉस्पिटलमधे चाललेले अवयव विक्रीचे रॅकेट उघड़कीला आणायचे ठरविले होते. तसे तिने मेहतांना सांगितले होते. तिला कल्पना नव्हती की तेच सूत्रधार आहेत. त्यावेळेसच तिला संपवायचे त्यांनी ठरवले."

"तुम्हाला कल्पना होती?"

"अस्पष्ट होती. मी सावध करण्याचा प्रयत्न केला पण ती ऐकायला तयार नव्हती. त्यातच तिचे बाळंतपणाचे ऑपरेशन उद्‌भवले."

"एवढ्या सुसज्ज हॉस्पिटलमधे कसला प्रॉब्लेम येऊ शकतो?"

"ऑपरेशन करणारे डॉक्टर मेहता आणि डॉक्टर शर्मा होते हाच मुख्य प्रॉब्लेम होता." सुनंदा शांतपणे म्हणाली.

"पण मेडिकल एथिक्स, हिप्पोक्रेटिक ओथ?"

"ज्यांना शक्य आहे असे गरजवंत किडनीसाठी २५/३० लाख सहज देतात. त्याच्यापुढे या गोष्टी गौण आहेत. त्यादिवशी ज्या पद्धतीने मेहतांनी ऑपरेशनला सुरवात केली तीच संशयास्पद होती. त्यांचे हात थरथरत होते. सारखा घाम पुसत होते. दहा मिनिटातच शर्मांनी त्यांना बाजूला केले पण तोवर फार उशीर झाला होता. शर्मांनी बाळ बाहेर काढून स्वच्छ केले. दोन मिनिटे प्रयत्न करूनही ते श्वास घेईना किंवा रडेना म्हणून माझ्याकडे देत डिस्पोज कर असे सांगितले."

"मेहता एवढा वेळ काय करत होते?"

"सुन्न होऊन बाजूला उभे होते. त्यांना स्वतःलाही सावरता येत नव्हते. मी डिस्पोजल बॅगमधे बाळ ठेवले आणि लगेच बाहेर पडले."

"तेंव्हा डेव्हिड बाहेर नव्हता?"

"नव्हता. मी डिस्पोज रूमकडे जाऊ लागले. जेमतेम वीस पंचवीस पावले गेली नसेल तोच मला बाळाचा क्षीण आवाज ऐकू आला. आता परत आत गेल्यास ते खाटीक याचापण प्राण घेतील अशी मला भीती वाटली म्हणून मी

सरळ बाहेर पडली आणि जवळच्याच सिटी हॉस्पिटलला गेली. तिथे माझी मैत्रीण रेखा काम करते. मी तिला ते बाळ दिले आणि दोन दिवसांनी पुरेसे स्टेबल झाल्यावर अनाथ आश्रमात हलविले.”

“तुम्हाला कोणी, काही विचारले नाही?”

“नाही. मी नर्स आहे आणि माझ्यावर सर्वांचा विश्वास आहे. मी कोणतेही गैरकृत्य करणार नाही याची सर्वांना खात्री आहे. एव्हाना रूथची केस पेपरमधे गाजू लागली होती त्यामुळे मी घाबरले आणि सरळ पुण्याला आले. आता जेंव्हा जमेल तसे बाळाला भेटते. बाकी केसचे काय झाल वगैरे त्याच्याशी माझा काही संबंध नाही.”

यानंतर दोन मिनिटे दोघेही काहीच बोलले नाही. शेवटी जॉनीने विचारले, “डेव्हिडला हे माहिती आहे?”

“नाही.”

“रूथचा अजून कोणी प्रेमी?”

“शक्यच नाही. कॉलेजचे माहिती नाही आणि डेव्हिडला हा प्रश्न विचारू नका. तो तुम्हाला परत काही विचारायला शिल्लक ठेवणार नाही. त्या दिवशी पोलीस पाच मिनिटे उशिरा आले असते तर हे दोन्ही डॉक्टर मेलेच असते.”

“ते बाळ आता मोठे. . .”

"लीला आता एक वर्ष आणि सात महिन्याची आहे एकदम रुथसारखी दिसते. मी तिचा पत्ता देते. मला आता गेले पाहिजे. मला वाटते तुमच्या सर्व प्रश्नांची मी उत्तरे दिली आहेत. माझे फक्त एकच मागणे आहे."

जॉनी सावकाश उठला आणि तिला अजून काही बोलू न देता स्थिर आवाजात ठामपणे म्हणाला, "मला कल्पना आहे. रूथला न्याय मिळेल. ती जबाबदारी माझी." आणि बाहेर पडला.

जॉनीचे काहीतरी बिनसले आहे हे रोमानी अंदाजे ओळखले पण तो स्वतःहून काही सांगणार नाही याची तिला खात्री होती. त्यादिवशी त्यांनी मनसोक्त शॉपिंग केले. बाहेरच जेवले. जॉनी फक्त बरोबर एवढेच. त्याचे लक्ष मुलांशी खेळण्यातपण नव्हते. घरी पोचल्यावर न राहवून तिने विचारलेच. जॉनीने सर्व सांगितले.

"एवढेच होय. म्हणजे लीलाच्या काळजीने तू अपसेट आहे तर."

"होय. लीलाचा काय दोष?"

"मी काही तत्वज्ञानी नाही पण चार दिवसांनी मी परतेन तेव्हा आपण तिला भेटू आणि घरी आणू. केस संपल्यावर ज्याची अमानत त्याला परत करू. मग तर झाले?"

"पण डेव्हिड तर वेडा आहे."

"वकिलांनी वेडा केला आहे. माझी खात्री आहे तो वेडा नाही."

तिचे हात हातात घेऊन जॉनी म्हणाला, "रोमा तू खरच ग्रेट आहे."

रोमा हसून म्हणाली, “मस्का मारतोस? उमेश अंकलसाठी शिल्लक ठेव.”

किंचित चिडून जॉनी म्हणाला, “त्या हिटलरचे नाव नको काढू.”

अगदी बोलाफुलाला गाठ पडल्यासारखा त्याच वेळी मोबाईल वाजला. फोनवर अजय होता.

“सर, आपले तीनही सदस्य जिवंत आहेत. रुथच्या बाबतीत अद्याप काही हाती लागले नाही.”

त्याने रिपोर्ट केला.

जॉनीने सुनंदा भेटीत काय झाले ते त्याला सांगितले. आहे ती व्यवस्था अशीच चालू ठेवू यावर दोघांचे एकमत झाले.

दुसऱ्या दिवशी दुपारी दोनच्या सुमारास परत अजयचा फोन आला.

“सर, मेहताचा अपघाती मृत्यू झाला आहे.”

“काय? अपघात कसा झाला?” जॉनीने आश्चर्याने विचारले.

“हॉस्पिटलच्या वरच्या दोन मजल्यांचे बांधकाम चालू आहे. मेहतांना घाईघाईने वरती जातांना काही लोकांनी बघितले. तेथील कामगारांची जेवणाची वेळ झाल्याने तेथे कोणीही नव्हते. एका गॅलरीच्या कठड्यावरुन रेलून खाली बघत असता त्यांच्या भाराने कठडा कच्चा असल्याने खचला. खाली पेव्हमेंट असल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला.” अजयने थोडक्यात सांगितले.

“मी निघालोच” जॉनी म्हणाला.

-----------*---------

# प्रकरण ७

जॉनी दुपारी दोनच्या फ्लाईटने परत गोव्याला आला. अजय एअरपोर्टवर आला होता.

“इंस्पेक्टर जाधव यांच्याकडे केस आहे.” अजयने अधिक माहिती पुरवली.

“वरून खाली बघत होते म्हणजे कोणाची तरी वाट बघत असतील. मोबाईलमधे शेवटचा कॉल कोणाचा होता?”

“अर्धा तास आधी एका डॉक्टरचा होता. पेशंट संबंधी.”

“म्हणजे इंटरनल फोनवर निरोप आला असणार.”

“शक्य आहे.”

“आपल्या मित्राने काम सुरु केलेले दिसते. आयुक्तांचे काय मत आहे?”

“साहेबांनी तर दुर्दैवी अपघात. तपास सुरू आहे अशी प्रेसनोट दिली आहे.”

“प्रत्यक्ष भेटल्यावर कळेलच म्हणा.”

त्यांना फार काळ वाट बघावी लागली नाही. दहा मिनिटांनी नीलाचा फोन आलाच.

‘चलो बुलावा आया है’ म्हणत ते दोघेही आयुक्तांना भेटायला गेले.

“जॉनी मला वाटते तुझा तर्क बरोबर आहे पण आपले प्रयत्न कमी पडत आहेत.”

जॉनी काहीच बोलला नाही.

“त्या नर्सचा काही शोध लागला?”

जॉनीने सुनंदा बरोबर झालेले सर्व संभाषण सांगितले. त्यासरशी ते खुर्चीतच ताठ बसले.

“म्हणजे तू तिला शोधायला जात आहे हे आपल्या मित्राला ठाऊक होते किंवा त्याने तर्काने ताडले. एवढेच नव्हे तर सुनंदाचे महत्त्व ओळखून त्याने ती येत असल्याचे सांगून मेहतांना भेटायला बोलावले असणे शक्य आहे.”

या लेकाला बसल्या जागी धागेदोरे लावणे फार छान जमते. हवामान खात्यात असता तर पाऊस तरी वेळेवर येत आहे की नाही हे तरी कळले असते. जॉनी चडफडत मनात म्हणाला.

‘खरच फारच हुशार व्यक्तीशी गाठ पडली आहे’ आयुक्त स्वतःशीच म्हणाले.

“सर. तुम्हालापण वाटते की हा खून आहे?”

“खात्री आहे. फक्त प्रेस आणि मीडिआचा ससेमिरा नको म्हणून अपघात जाहीर केला आहे. आता वेळ घालवू नका. अजय रूथच्या मित्रांबद्दल काही कळले?”

“नाही. राहत्या ठिकाणी चौकशी केली. काही कळले नाही.”

“शाळेत बघ. कोणीतरी भेटेलच.”

बाहेर पडणार तोच अजयने विचारले, “डॉक्टर गोपाल आठ दहा दिवस बाहेरगावी जायचे म्हणत आहे. लग्नकार्य आहे आणि घरची मंडळी आधीच गेली आहेत.”

“जाऊ दे. आपण काही त्यांना अडवू शकत नाही. केंव्हा जाणार आहेत?”

“उद्या.”

“ठीक आहे.”

विचार करतच दोघेही बाहेर पडले.

अजय म्हणाला, “सर, तुम्ही म्हणाला होता की अशी शक्यता आहे की दोघांचा कॉमन मित्र, कॉन्टॅक्ट ज्याला हे सर्व उशिरा कळले आणि तो पेटून उठला असेल.”

“पूर्ण शक्यता आहे.”

“मग आपण आता तो कॉन्टक्ट शोधायला पाहिजे. नेहमीचा प्रेमाचा त्रिकोणपण असू शकतो.”

“शक्य आहे. असू शकतो पण उघड नसेल तर आपल्याला शोधावा लागेल. डेव्हिड आणि रूथ बालमित्र होते. एकाच शाळेत होते. तिथून सुरवात करू.”

एव्हाना ते बिशप हायस्कूलला पोचले होते. शाळेच्या ऑफिसमधील मुख्य हेमंत प्रधान यांना ते भेटले. “तुम्हाला नक्की काय पाहिजे हे मला कळले नाही.”हेमंत म्हणाला.

“रूथ आणि डेव्हिडच्या वर्गमित्रांची यादी. साधारणपणे दहावी ते बारावीची.”

त्यानी दहा मिनिटात यादी दिली. साठ नावे होती.

“ठीक आहे. तुम्ही यातल्या किती जणांना ओळखता किंवा आता यातले कोण सध्या कुठे आहे हे सांगू शकता?”

“माझा यांच्याशी तसा प्रत्यक्ष संबंध कधी आला नाही. तसा डेटापण उपलब्ध नाही. त्यांचे एक शिक्षक, श्री. वाडेकर हे तुम्हाला काही सांगू शकतील. ते मागील वर्षीच निवृत्त झाले.”

“त्यांचा पत्ता, मोबाईल नंबर.”

ती रात्र शांततेत गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता ते दोघेही वाडेकर सरांच्या समोर बसले होते.

“इतके विद्यार्थी हाताघालून गेले असतात की प्रत्येकाचे नाव आठवणे कठीण असते. समोर असला तर जरा सोपे पडते.” सरांनी सुरवात केली.

“तरी बघा प्रयत्न करून . रूथ आणि डेव्हिड अगदी पहिलीपासून याच शाळेत होते.”

“हो. हो. ते दोघेही आठवतात. रूथच्या बाबतीत फार वाईट झाले हो.”

“त्या दोघांत काही भांडणे?”

“छे. छे. ते बालमित्र होते. दोघांचे एकमेकावर निरतिशय प्रेम होते. रूथ तर अतिशय लोकप्रिय होती.”

एक एक मिनिट महत्वाचा होता आणि सर भूतकाळात रमले होते.

जॉनीला तिच्या गुणवर्णनात काही रस नव्हता.

“इतकी लोकप्रिय होती तर अजूनही काही प्रेमी असतील?”

“बरेच असतील पण तिचे आणि डेव्हिडचे प्रेम सर्वश्रुत होते त्यामुळे कोणी असले तरी त्यांची व्यक्त करायची हिंमत नव्हती. रूथला अंतर ठेवून वागणे छान जमायचे. डेव्हिड मात्र तापट होता.”

येथे तासभर जरी विचारत बसलो तरी अशीच उत्तरे मिळतील याची जॉनीला खात्री वाटली.

“बर ठीक आहे. त्यांच्या बॅचमधला कोणी अतिशय बडबडा, चौकस विद्यार्थी सांगू शकता?”

“असा विद्यार्थी? जरा आठवावे लागेल. बघू ती यादी.” असे म्हणत सरांनी यादी घेतली परत परत नीट वाचली आणि म्हणाले, “हा विवेक सिंघानिया. हो, याला कॉन्टॅक्ट करा. याला दुनियेच्या सर्व बातम्या असतात आणि याला जर माहिती नसेल तर कोणालाच नसेल. पण आता कुठे असेल मला माहिती नाही. एकदा काय झाले. . .”

ते आमच्यावर सोडा म्हणत जॉनीने यादी घेतली आणि अजयकडे दिली.

-----------*---------

# प्रकरण ८

अर्ध्या तासात अजयने विवेकचा नंबर, पत्ता मिळवला.

“सर सध्या हा पणजीतच आहे पण बरेचदा बिझिनेससाठी बाहेर जातो तेव्हा आपल्याला घाई करावी लागेल.”

कीर्ती गारमेन्ट्सच्या आलीशान इमारतीत जॉनी आणि अजय पोचले तेव्हा दुपारचे बारा वाजले होते. विवेकच्या पीए जवळ त्यांनी विचारणा केली. ते आहेत पण मिटिंगमधे बिझी आहेत. किती वेळ लागेल अशी विचारणा केल्यावर ’अजून तास लागेल. तोवर तुम्ही बसा’ असे अदबीने सांगण्यात आले.

“तेवढा वेळ नाही मॅडम. तुम्ही त्यांना निरोप द्या किंवा आम्ही आत जातो.” अजय शक्य तेवढ्या नम्रतेने म्हणाला.

अजून काही बोलले तर हे धूड आत घुसेल याची खात्री पटल्याने ती खालच्या आवाजात म्हणाली की मी प्रयत्न करते आणि आत गेली आणि दुसऱ्याच क्षणी विवेकला घेऊन बाहेर आली. विवेकच्या चेहऱ्यावर त्रासीक भाव होते.

“एवढी काय अर्जन्सी आहे?”त्याने विचारले.

“विवेक, प्रश्न आम्ही विचारणार आहोत आणि उत्तरे तुला द्यायची आहेत . प्लीज को-ऑपरेट अन्यथा पोलीसस्टेशनला जाऊन निवान्त बोलू.” जॉनी शांतपणे म्हणाला.

विवेकने जवळच्या केबिनकडे हात केला. आवश्यक तेवढीच माहिती देत जॉनीने विचारले.

“रूथचा अजून कोणी प्रियकर होता?”

“तिच्यावर मरणारे खूप होते पण कोणी आसपास पोचणार नाही याची काळजी घेणारा मंगेश होता.”

“म्हणजे?”

“रूथ ही अतिशय लोकप्रिय आणि मनमिळावू होती. कोणालाही न दुखवता कसे अंतर राखावे हे तिच्याकडून शिकण्यासारखे होते. रूथ आणि डेव्हिडला कोणी त्रास देणार नाही याची दक्षता मंगेश देसाई घेत असे .”

“मंगेश आणि रूथचे काही. . ?”

“शक्यच नाही. तो दोघांचाही मित्र, बंधु,सखा सोबती सर्व काही होता.”

“सध्या कुठे असतो?”

“अमेरीकेला सेटल झाला असे ऐकले होते. एवढ्यात आला असेल तर कल्पना नाही कारण मी पण सतत बाहेर असतो. मागील आठवडा मी राजकोटला होतो. कालच आलो.”

“रूथच्या बाबतींत जे घडले ते त्याला माहिती असायची शक्यता?”

“खात्रीने माहिती नसेल.”

“इतक्या ठामपणे कसे काय म्हणतोस?”

“त्याला माहिती असती तर त्याने रूथच्या मृत्युला जबाबदार असणाऱ्या सर्वांचे एव्हाना खून केले असते.” विवेक शांतपणे म्हणाला.

“आता मला प्रामाणिकपणे सांग तो भारतात आल्यावर तो सर्वप्रथम कोणत्या मित्राशी संपर्क करेल?”

“डेव्हिड.”

“पण डेव्हिड तर. . .”

“तुम्हालाही तसेच वाटते?”

जॉनी क्षणभर विचारात पडला. नंतर जाण्यास उठला. थोडा थबकला आणि विवेकला म्हणाला, “जर मंगेशने तुला कॉन्टॅक्ट केलाच तर मला ताबडतोब कळव.”

“विदाउट फेल कळवेन.”

“बाय द वे. या मंगेशचा कसला व्यवसाय आहे?”

“व्यवसाय?” विवेक बावचळून म्हणाला, “तो नामांकित मानसोपचार तज्ञ आहे.”

शांत रहायला जॉनीला फार प्रयास करावा लागला. अजयला त्याने चलण्याची खूण केली. बाहेर येताच वेड्यांच्या इस्पितळाकडे गाडी घ्यायला सांगितली.

अर्ध्या तासात त्यानी इस्पितळ गाठले. डॉ. दीक्षित त्यांना केबिनबाहेरच भेटले.

“ डॉक्टर, तीन दिवसापूर्वी डॉ. मंगेश देसाई डेव्हिडला भेटले हे तुम्ही आम्हाला का सांगितले नाही?”

जॉनीने सरळ तोफ डागली.

दीक्षित थोडे विचारात पडले मग आठवल्यासारखे करून म्हणाले, “अहो ते तर इस्पितळ बघायला आले होते. त्यांनीच चार पाच टिपिकल केसेस चेक करण्यासाठी निवडल्या होत्या. त्यात डेव्हिडपण होता. ते काही त्याला भेटायला आले नव्हते.”

‘फार हुशार माणसाशी गाठ पडली आहे’ जॉनीला आयुक्तांचे शब्द आठवले.

“कसे आहेत ते दिसायला?”

“जवळपास तुमच्यासारखे आहेत. एखाद्या ॲथलेटसारखी पिळदार शरीरयष्टी आहे. गोरेपान, नाक धारदार, घारे डोळे, क्रू कट,तडफदार एकदम हिरो.”

डॉक्टर फारच प्रभावित झालेले दिसत होते.

“त्यांच्या भेटीनंतर डेव्हिडमधे काही फरक जाणवतो काय?”

“हो तर. तो आता जरा प्रतिसाद द्यायला लागला आहे. फार नाही पण आधीपेक्षा बराच.”

“अरे वा. फारच छान. चला आपण त्याला भेटू.”

“हो, जरूर. आता तो बाहेर लॉनवर असेल. आपण तिथेच जाऊ.”

बोलता बोलता ते बाहेर आले. लॉन म्हणण्या एवजी एक टुमदार बाग म्हणणे योग्य झाले असते. चालण्यासाठी, जॉगिंगसाठी छोटे रस्ते, अधूनमधून बसण्यासाठी लाकडी बाक, गुलमोहराची झाडे, निरनिराळी फुलझाडे,रमणीय दृश्य होते. बरेच पेशंट सावकाश फिरत होते, काही हिरवळीवर बसले होते, काही बाकावर बसले होते. एव्हाना संध्याकाळचे सव्वासहा झाले होते. संध्याकाळच्या लांब सावल्या पडायला सुरवात झाली होती.

“तो बघा डेव्हिड.” कंपाउंड जवळच्या एका बाकाकडे बोट दाखवून दीक्षित म्हणाले.

तिथे डेव्हिड एकटाच बाकावर बसून दूर कुठेतरी एकटक बघत बसला होता.

हे तिघेही त्याच्याजवळ पोचले तरी त्याने त्यांची दखलपण घेतली नाही. तो आपला एकटक दूर बघत होता. अशीच दोन मिनिटे गेली. नंतर जॉनीने विचारले, “डेव्हिड, काय बघतोस?”

परत दोन मिनिटे अशीच गेली. जॉनीने उत्तराची आशा पूर्ण सोडली असता डेव्हिड हळूच म्हणाला,” ते पक्षी.”

चकित होऊन जॉनीने विचारले,” कुठे आहेत?”

डेव्हिडने हळूहळू उजवा हात वर केला आणि बाहेरच्या एका टेलिफोन पोलकडे बोट दाखवून म्हणाला, "तिथे आहेत."

खरच त्या पोलवर तीन पक्षी बसले होते. सर्वजण ते पक्षी बघत असता त्यातील एक उडाला.

कोणी न विचारताच डेव्हिड म्हणाला," एक उडाला. दोन राहिले."

दीक्षित तर आपला पेशंट किती छान प्रतिसाद देत आहे हे बघून खुश झाले होते पण जॉनीला मात्र जणू विजेचा शॉक बसल्यासारखे झाले. त्याने विचारले,

"बाकीचे दोघे केंव्हा उडतील?"

"आजच उडतील." पोलवरील नजर न हटवता डेव्हिड म्हणाला.

हे ऐकताच डॉक्टरांचा निरोप घेण्याचेपण सौजन्य न दाखवता जॉनी तडक बाहेर निघाला. त्याच्यामागे धावत जात अजयने त्याला गाठले आणि विचारले,

"सर, काय झाले?"

"ते गाडीत सांगतो. शर्माची गाडी किती वाजताची आहे?"

"सव्वासात."

"आपल्याला शर्माला गाठायचे आहे. हाती वेळ फक्त वीस मिनिटे आहे. लवकर स्टेशनला चल."

गाडीत पण जॉनीने शर्माला फोन लावण्याचा खूप प्रयत्न केला पण फोन बहुधा ऑफ असावा. शेवटी त्याने प्रयत्न थांबवला आणि अजयला म्हणाला,

"आपली केस आजच संपणार आहे."

“कशावरून?”

“डेव्हिड काय म्हणाला ते कळले नाही?”

“काय?”

“उरलेले दोन्ही पक्षी आजच उडणार आहे. ?

आता अजयची ट्यूब पेटली.

“म्हणजे त्याला असे म्हणायचे होते काय की. . .”

“होय. म्हणून घाई कर.”

कितीही घाई केली तरी हेवी ट्रॅफिकमुळे ते साडेसातला स्टेशनला पोचले तेव्हा त्यांना आवारातच एक अँब्युलन्स क्रॉस झाली.

ते धावतच स्टेशन मास्तरांच्या ऑफिसमधे गेले. ते काही रेल्वे पोलिसांच्या बरोबर सीसीटीव्हीचे फुटेज बघत होते. अजयने ओळख करून देताच त्यांनी त्यालापण फुटेज दाखविले. पोलिसांनी एव्हाना ओळख पटवली होती.

‘डॉ. गोपाल शर्मा. अपघाती मृत्यू. असे त्यांच्या केसपेपरवर आधीच नोंद झाली होती. ’

“सर, तुम्ही फुटेज बघून खात्री करून घेऊ शकता. त्यांचा तोल गेलेला स्पष्ट दिसतो.” पोलीस अदबीने म्हणाला. अजय एक एक फ्रेम चेक करत होता. अचानक एका फ्रेमवर तो थांबला आणि जॉनीला दाखवत म्हणाला, “सर, इथे बघा.”

त्या फ्रेममधे एक हात शर्मांच्या खांद्यापाशी आलेला दिसत होता.

“हे आम्हीपण बघितले आहे पण हा हात कोणाचा हे गर्दीमुळे कळत नाही.” पोलीस म्हणाला .

काही न बोलता जॉनी आणि अजय बाहेर पडले. त्या वेळेस साडेआठ वाजले होते.

“सर, माझ्या माणसांनी सर्व हॉटेल्स चेक केलीत पण मंगेश देसाई या नावाचा कोणीही सापडला नाही. तो नाव बदलून तर फिरत नसेल?” अजय गाडीत बसल्याबरोबर म्हणाला.

त्याही परिस्थितीतही जॉनीला हसायला आले.

“का हो सर, काय झाले? काही चुकले का माझे?”

“अरे एवढा शांत डोक्याने प्लॅन करणारा माणूस, ज्याचे पन्नास साठ मित्र या शहरात सहज असतील तो हॉटेलमधे उतरायचा धोका कशाला पत्करेल? शिवाय चार दिवसाचा तर प्रश्न आहे. तेवढ्यासाठी नाव बदलायचा फंदात तो पडणार नाही.”

“त्याचा मित्रपरिवार तर फारच मोठा आहे. विवेककडून काही माहिती आली?”

“त्याचे मित्र शोधण्यापेक्षा त्याचे टार्गेट शोधायला पाहिजे आणि तेच आपण करत आहोत. दुर्दैवाने पहिल्यावेळी आपल्याला एक तास उशीर झाला तर दुसऱ्यावेळी पंधरा मिनिटे. आता या घाटे वकिलाबरोबर आपण सतत राहिले पाहिजे कारण हा मंगेश आता त्याला आजच उडवेल.”

“ आता घाटे कुठे असेल आणि त्याच्याबरोबर कोण आहे?”

अजयने कन्फर्म केले आणि सांगितले की घाटे वकील रोजच्याप्रमाणे गॅलेक्सी बारमधे आहेत आणि एकटेच आहेत. दहाच्या आधी तर ते कधीही बाहेर येत नाही.

एव्हाना साडेनऊ झाले होते. जॉनीचे विचारचक्र जोरात सुरू झाले. तो स्वतः ला मंगेशच्या जागी कल्पून मंगेश काय करेल याचा विचार करू लागला. त्याने अजयला गॅलेक्सीकडे गाडी घ्यायला सांगितली. तेथे त्यांना कळले की पावणेदहाच्या आसपास घाटे वकील बारमधून गेले . पूर्ण नशेत होते पण त्यांच्या सोसायटीत पोचले आहेत आणि एकटेच आहे.

हे ऐकताच जॉनीने कपाळावर हात मारून घेतला आणि अजयला म्हणाला, “अजय त्याने आपली चाल आधीच ओळखली. गाडी ताबडतोब घाटेच्या घराकडे घे.”

रात्री दहाच्या सुमारास जेंव्हा अजयने गाडी सोसायटीच्या आवारात कर्कश्य आवाज करत ब्रेक मारत थांबवली तेंव्हा वॉचमन ओरडत आला. त्याला हातानेच थांबण्याची खूण करत जॉनीने विचारले, “घाटे वकील?”

“आताच लिफ्टने वर गेले.”

लिफ्टकडे पळत जात जॉनीने परत विचारले,”कितवा मजला?”

काहीतरी गंभीर प्रकार आहे हे वॉचमनच्या लक्षात आले होते. तो पण त्याच्याबरोबर पळत म्हणाला, “टॉप,पण साहेब झाले काय?”

"झाले नाही. होणार आहे. अजय, घाटेला फोन लाव आणि थांबव."

"मगापासून ट्राय करतोय. उचलत नाही."

एव्हाना ते लिफ्टपाशी पोचले होते. एकच लिफ्ट होती. दुसरा मजला क्रॉस करून लिफ्ट हळूहळू वर जात होती.

"चला, जिन्याने." जॉनी ओरडला.

तिघेही जिन्यावरून वेगाने पळू लागले.

पण जेमतेम तिसऱ्या मजल्यावर असतांना त्यांना गॅस सिलेंडरच्या स्फोटाचा आवाज ऐकू आला.

तसेच पळत ते सहाव्या मजल्यावर पोचले तेंव्हा घाटेच्या फ्लॅटमधून आगीचे लोट बाहेर पडत होते. फ्लॅटचा दरवाज्याच्या चिरफळया उडाल्या होत्या आणि त्यातून आत पडलेले घाटेंचे मृत शरीर स्पष्ट दिसत होते.

आता अजयने सूत्रे हाती घेतली. फायर ब्रिगेड, नजिकचे पोलीस स्टेशन यांना संपर्क केला. इन्स्पेक्टर सावंत ताबडतोब आले. नंतरच्या दहा मिनिटात सर्व यंत्रणा कामाला लागल्या. अर्ध्या तासात परिस्थिती आटोक्यात आली. मेडिकल टीम घाटेचे मृत शरीर घेऊन गेली. जॉनीने फायर ब्रिगेडच्या लोकांना विचारले, """स्फोटाचे कारण?"

"गॅस लिकेज."

वॉचमन धक्क्यातून पुरता सावरला नव्हता. त्याला जॉनीने विचारले, "घाटे एकटेच होते?"

"हो. फॅमिली गावी गेली आहे."

"नीट आठवून सांग. सकाळपासून त्यांच्याकडे कोण कोण आले होते?"

"साहेब, त्यांच्याकडे रीनोव्हेशनचे काम सुरू होते. पाच सहा लोक गेल्या आठवडाभर रोज यायचे तसे आजही आले होते. काम संपल्यावर मी सर्व चेक करीत असे व मला किल्ली देऊन ते परत जात. तसेच आजही गेले."

"तेंव्हा गॅसचा वास नाही आला?"

"नाही साहेब. तेंव्हा सर्व ठीक होते."

थोडा विचार करून जॉनीने विचारले, "अजून कोणी आले होते?"

डोके खाजवत वॉचमन म्हणाला, "होय साहेब. ते लोक गेल्यावर दहा मिनिटे होत नाहीत तर त्यांचा मालक आला."

"तुला कसे माहिती की तो त्यांचा मालक आहे म्हणून?"

"त्याने विचारले की आमची माणसे आहेत की गेली म्हणून. मी जेव्हा सांगितले की जाऊन दहा मिनिटे झाली असतील. तर तो म्हणाला की माझे इथले काम आज संपले आहे. तरी मी वर जाऊन काही टूल्स विसरले की काय बघून येऊ शकतो काय? नाहीतर उद्या परत यावे लागेल."

जॉनीने सहेतुकपणे अजयकडे बघितले आणि विचारले, "तू जाऊ दिले?"

वॉचमन ओशाळून म्हणाला," काय करणार साहेब. माणूस एकदम जंटलमन टाइपचा होता. मी बरोबर यायला उठलो तर म्हणाला पाच मिनिटांचे काम आहे. तुम्ही कशाला त्रास घेता आणि बरोबर पाच मिनिटात आलापण."

जॉनी मनात म्हणाला बरोबर आहे. गॅस सुरू करायला पाच मिनिटे खूप झाली.

“किती वाजता आला होता तो?”

“सव्वाआठ ते साडेआठ झाले असतील साहेब.”

काहीश्या निराशेने जॉनीने अजयला निघण्याची खूण केली. खाली आल्यावर अजय म्हणाला,” सर, यावेळी पण आपल्याला उशीर झाला.”

-----------*---------

# प्रकरण ९

अजयने गाडी सुरू केली आणि निघणार तेवढ्यात वॉचमन त्यांच्याकडे धावत येताना दिसला.

तो धापा टाकतच गाडीपाशी आला आणि हातातील एक पाकीट जॉनीला देत म्हणाला,'' त्या माणसाने एवढे पाकीट जेंव्हा मेडोंझा साहेबांना येतील तेंव्हा त्यांना दे म्हणून सांगितले होते. आत्तावरचे साहेब म्हणाले की तुम्हीच मेडोंझा साहेब म्हणून धावत आलो.''

जॉनीने पाकीट घेतले आणि अजयला चलण्याची खूण केली. एव्हाना रात्रीचे साडेअकरा वाजले होते.

तेवढ्यात एक चौक आला. डावीकडे शहर होते उजवीकडे एअरपोर्ट.

''सर, कुठे?'' अजयने विचारले.

''एअरपोर्ट.''

जॉनीने पाकीट उघडले आणि पत्र मोठ्याने वाचू लागला.

प्रिय मित्र जॉनी आणि अजय,

सप्रेम नमस्कार.

सर्व प्लॅनप्रमाणे पार पडल्यास हे पत्र तुम्हाला रात्री साडेअकराच्या सुमारास मिळेल त्यावेळी रूथचा तिसरा मारेकरीपण पृथ्वीवरून नाहीसा झाला असेल आणि मी, मंगेश देसाई अमेरिकेला जाण्यासाठी निघालो असेन.

जॉनी, तुझा तर्क अगदी बरोबर होता. डेव्हिड,रूथ आणि मी बालमित्र. डेव्हिडचे रूथवर निरतिशय प्रेम होते. माझेपण होते,कदाचित डेव्हिडपेक्षा कांकणभर जास्तच. फरक एवढाच होता, तो बोलून दाखवायचा मी बोलत नव्हतो. नकळतच मी त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी घेतली कारण रूथ सदा आनंदात असावी, सुखात राहावी हीच माझी इच्छा होती. यथावकाश आम्ही मोठे झालो. आमच्या वाटा वेगळया झाल्या. माझे कुटुंब अमेरिकेला स्थायिक झाले. आमचा संपर्क कमी होत हळूहळू तुटला. तशातच पंधरा दिवसांपूर्वी माझ्या मुंबईच्या मावसभावाच्या लग्नासाठी मी मुंबईला आलो. आलोच आहे तर गोव्याला पण जाऊन येऊ . परत कधी येणे होईल न होईल असा विचार करून मी गोव्याला आलो. विमानाने न येता मी बाय रोड आलो कारण मला कदाचित शेवटच्या वेळी जवळून माझा देश बघायचा होता.

गोव्यात आल्यावर एका मित्राकडून डेव्हिड आणि रूथ बद्दल जे कळले ते ऐकून माझे डोकेच फिरले. तरीपण मी कसेबसे स्वतःला सावरले आणि डेव्हिडला भेटलो. त्याने मला सर्व कथा सविस्तर सांगितली. मी त्याला धीर देत चार दिवसात रूथच्या मारेकऱ्यांचा खून करेल असे वचन दिले आणि बाहेर पडलो. वचन तर दिले खरे पण कसे पूर्ण करायचे ते सुचत नव्हते. परत येतांना मला चर्च दिसले. हेच ते चर्च होते जेथे लहानपणी आम्ही तिघेही खेळत असू.

तेव्हाच दिसले की बाजूच्या ग्रेव्हयार्डमधे दफनविधी सुरू आहे. मी तेथील गर्दीत मिसळलो. रुथची कबर शोधली आणि परत माझा संताप अनावर झाला. त्याच तिरीमिरीत मी चर्चमधे गेलो. कन्फेशन बॉक्समधे बसलो आणि तीन खून करण्याची प्रतिज्ञा बोललो. पलीकडून जे फादर ऐकत होते त्यांनी मला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण मी तसाच बाहेर पडलो आणि ग्रेव्हयार्डमधील गर्दीत मिसळलो. तिथे मला माझा वर्गमित्र विक्रम अरोरा भेटला. त्याने मला आग्रह केला आणि त्याच्या घरी घेऊन गेला. तो घरी एकटाच होता. हे माझ्या दृष्टिने फार चांगली गोष्ट होती. तिथेच मला शांतपणे योजना आखण्यास वेळ मिळाला. माझ्या तीनही टार्गेटसची दिनचर्या मी अभ्यासली.

घाटे वकीलाकडे रिनोव्हेशनचे काम सुरू होते म्हणून त्याचा नंबर मी शेवटी लावला आणि डॉ. सतीश व डॉ गोपाल यांच्यावर लक्ष केंद्रित केले. मी केलेले कन्फेशन फादर कितपत गांभीर्याने घेतील आणि जर पोलिसात रिपोर्ट करतील तर पोलीस कसा तपास करतील याबद्दल माझ्या मनात शंका होती पण त्याच दिवशी रात्री सायरन वाजवत पोलीस माझ्या तीनही टार्गेटसच्या घरापाशी गस्त घालू लागले तेव्हाच मला कळून चुकले की माझ्यापेक्षाही कुशाग्र माणसाशी गाठ पडली आहे. तुम्ही दोघे या केसवर काम करीत आहात हे माहीत करून घ्यायला मला काही विशेष कष्ट करावे लागले नाही. त्या रात्री डॉ. सतीश वाचले पण माझ्या लक्षात आले की मी जर घाई केली नाही तर माझ्या मित्रांची दारे अजय लवकरच ठोठावेल .

दुसऱ्या दिवशी मी शांतपणे परत केस वाचली आणि तुम्ही कुठून सुरवात कराल असा विचार केला. मला लक्षात आले की जॉनी सर्वप्रथम सुनंदाला भेटेल आणि दुसऱ्या दिवशी जेंव्हा अजय मला दोन वेळा एकटा दिसला तेंव्हा मी तर्क केला की बहुतेक जॉनी सुनंदाला शोधण्यासाठी गेला. नंतर मी घाई केली. हॉस्पिटलमधूनच डॉ. सतीशला फोन केला की सुनंदा टॉप फ्लोअरला येत आहे. खरे म्हणजे त्याने दुर्लक्ष केले असते तरी तो वाचला असता पण अपराध्याला सतत धास्ती वाटत असते. तो वर येताच एक धक्का पुरेसा होता.

डॉ. गोपाल यामुळे घाबरला आणि बाहेरगावी जाण्यास निघाला. स्टेशनच्या गर्दीत त्याला इंजिनपुढे ढकलणे फारसे कठीण नव्हते. स्टेशनवरून मी सरळ घाटे वकिलाचे घर गाठले. याचाही मृत्यू अपघाती वाटावा हा माझा प्रयत्न होता. त्याचे पिण्याचे व्यसन माझ्या कामी आले. वॉचमनला विश्वासात घेऊन मी पाच मिनिटात गॅस सुरू करून आलो आणि स्फोट केंव्हा होतो याची सुरक्षित अंतरावरून वाट बघत बसलो. वॉचमनचा यात काहीही हात नाही. घाटे वकिलानी मला निराश केले नाही.

मी जे काही केले त्याबद्दल मला कसलीही खंत नाही खेद तर अजिबात नाही. या तिन्ही व्यक्ती मानवतेला काळिमा होत्या. जगायच्या लायकीच्या नव्हत्या. जे कायद्यानी करायला पाहिजे होते ते मी केले.

असो. बोर्डिंग सुरू झाले आहे त्यामुळे मला गेले पाहिजे.

माझी बाजू वाचल्यावर जर तुम्हाला अजूनही वाटत असेल की मला अटक करावी तर तुमचा एअरपोर्टला एक फोन पुरेसा आहे.

फक्त एकच विचारतो, ‘ माझ्या जागी तुम्ही असता तर तुम्ही काय केले असते?’

निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे. मी पूर्ण सहकार्य करेन.

तुमचा मित्र

मंगेश देसाई

एअरपोर्ट दिसू लागले होते. पत्र वाचून होताच जॉनीने अजयकडे बघितले.

पुढच्याच चौकात अजयने यू टर्न घेतला.

दुसऱ्या दिवशी आयुक्तांच्या ऑफिसमधे जॉनी आणि अजय मागे हात बांधून उभे होते. आयुक्तांसमोर दोन–तीन वर्तमानपत्रे पडली होती. रूथच्या केसमधील तिन्ही व्यक्तींचा तीन दिवसात अपघाती मृत्यू कसा झाला यावर भले मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्रासिक मुद्रेने त्यांनी विचारले,

“तुम्ही खुन्याला पकडू शकला नाही यावर माझा विश्वास नाही. जॉनी, नक्की काय झाले?”

जॉनीने एकवार अजयाकडे बघितले आणि खिशातील पत्र काढून आयुक्तांना दिले. आयुक्तांनी ते सावकाश वाचले. क्षणभर विचार केला. एक क्षण त्यांचा हात फोनकडे गेल्यासारखा वाटला पण थबकला. त्यांनी पत्राची घडी करून ते खिशात ठेवले.

“जॉनी, सुनंदाला बोलवून घे. अजय, प्रँक म्हणून एफ आय आर क्लोज कर.”

# प्रकरण १०

त्यानंतर दोन महिने जॉनीला फार धावपळ करावी लागली. आयुक्तांनी पुढाकार घेऊन रूथची केस रिओपन करायला लावली. सुनंदाची साक्ष फार महत्वाची ठरली. रीतसर कायदेशीर कारवाई करून डेव्हिडला निर्दोष सिद्ध करण्यात आले. सुनंदा सारख्या महत्त्वाच्या साक्षीदाराला पोलिसांनी का सादर केले नाही म्हणून पोलिसांच्या गलथानपणावर कोर्टाने कडक ताशेरे मारले.

इकडे रोमाने लीलाला घरी आणले होते. जॉनीच्या मुलाला, टोनीला ही लहान बहीण फारच आवडली. दादाची भूमिका तो आवडीने करू लागला. टोनीमुळे ती पण रोमाला ममा, जॉनीला डॅडी आणि डेव्हिडला अंकल म्हणू लागली.

सुनंदा महिन्यातून एकदातरी भेटायला येते.

डेव्हिड विवेकबरोबर काम करू लागला. लीलामुळे त्याच्या जगण्याला नवा अर्थ प्राप्त झाला. नवजीवन हॉस्पिटलमधे आमुलाग्र बदल करण्यात आले. डॉ. मेहता आणि डॉ शर्मा यांच्याशी संबंधीत सपोर्ट स्टाफची कसून चौकशी करण्यात आली आणि दोषींना बडतर्फ करण्यात आले.

अजयचे कार्यक्षेत्र वेगळे झाले आणि बरेच वाढले. तरीपण त्या चार दिवसात जे शिकायला मिळाले ते चार वर्षात पण मिळाले नसते हे त्याचे मत कायम आहे.

कधी जॉनी भेटलाच तर तो त्याला हे बोलून दाखवतो त्यावर जॉनी खांदे उडवून ‘त्यात काय विशेष’ एवढेच म्हणतो.

मंगेश नंतर कधीही कोणालाही भेटला नाही किंवा दिसलापण नाही.

-----------*---------

# प्रकरण ११

रविवारच्या प्रार्थनेची वेळ झाली होती. लोक हळूहळू येत होते. फादर दिब्रिटो कन्फेशन बॉक्समधे बसले होते. तोच पलिकडे कोणीतरी बसल्याचा आवाज आला.

“फादर.” एक शांत आवाज आला.

“येस माय सन.”

“आय वॉन्ट टू कन्फेस.”

“प्लीज गो अहेड.”

“तीन खून केलेल्या खुन्याला मी शक्य असूनही पकडले नाही. निसटू दिले. याची मला अजिबात खंत वाटत नाही पण मी केले ते बरोबर की चूक हे मला कळत नाही.”


यावर काय बोलावे याचा फादर विचार करू लागले.

असेच काही क्षण शांततेत गेले. कोणीतरी बॉक्समधून उठल्याचा आणि बाहेर गेल्याचा आवाज आला.

फादर लगबगीने बाहेर आले.


त्यांना चर्चबाहेर जाणारा पाठमोरा जॉनी दिसला


समाप्त




जगदिश खांदेवाले यांची या पूर्वीची सात पुस्तकं.

कव्हरवर फ़क्त एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.





अनाहुत
जगदिश खांदेवाले


जगदिश खांदेवाले
भास
आभास


जगदिश खांदेवाले
दहावा मैल
10


जगदिश खांदेवाले
अकस्मात

# ई साहित्य प्रतिष्ठान लवकरच १६ वर्षांचे होईल.

# जगदिश खांदेवाले यांचे हे आठवे पुस्तक.

जगदिश खांदेवाले यांच्या कथा वास्तवाशी जवळिक साधणाऱ्या, मनोरंजक आणि वैविध्यपूर्ण असतात. ते लिहितात कमी. पण जे लिहितात ते सकस, जोमदार, आणि भरीव असते. त्यामुळे ते वाचकांच्या मनाची पकड घेते. त्यांच्या पुस्तकांवर असंख्य वाचकांचा प्रतिसाद येतो आणि त्यात एक गोष्ट आवर्जून सांगितली जाते. ती म्हणजे"तुमचे पुस्तक हातात घेतल्यावर पुर्ण केल्याखेरिज खाली ठेवता येत नाही". त्यांच्या पुस्तकांना भरपुर मागणी आहे. पण ते अत्यंत मेहनतीने लिहीलेली आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), ), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५१ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत),

श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (८), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (९), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखा्नीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमुर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात

ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।